ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे
मासिक !

# छात्र प्रबोधन

सौर भाद्रपद, शके १९३५। वर्ष १३ अंक १२
मूल्य रुपये पंधरा



वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।
निर्विघ्नं कुरू मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।



# ईश्वरा...

ईश्वरा स्वप्नांस या तू वास्तवी आकार दे ।
शिल्प हे घडवावया अमुच्या करी सामर्थ्य दे ।।ध्रु.।।
अंधकारातून आम्ही चाललो तेजाकडे
या पथी पाऊल अमुचे ना पडू दे वाकडे
ज्ञानदीपाच्या प्रकाशी जीवने उजळून दे ।।१।।
ईश्वरा....

उंच आकाशी उडाया तू आम्हांला पंख दे
भूमिला भेदावयाला अंतरी उद्रेक दे
मनामनातून येथे विज्ञानगंगा वाहू दे ।।२ ।।
ईश्वरा...

पुत्र मातीचे आम्ही, मातीत राबावे सुखे
कष्टता आनंद वाटो कार्य होवो नेटके
धावण्याची आस पोटी आणि ओठी गीत दे ।।३ ।।
ईश्वरा...

एकटा नाहीच मी ही जाण जागू दे मनी
राहु दे आजन्म आम्हा या समाजाचे ऋणी
त्याचिया उत्थानयत्नी शक्ति सारी लागु दे ।।४ ।।
ईश्वरा....

थोर या राष्ट्रात झाला जन्म मोठे भाग्य हे
अंबरी किर्ती ध्वजा चढवू तयाची निश्चये
वैभवी नांदो सदा ते हाच आशीर्वाद दे ।।५ ।।
ईश्वरा स्वप्नांस या तू वास्तवी आकार दे !

– कै. नारायण विष्णु गोडसे


**।। गणेश प्रतिष्ठापना उपासना पोथी ।।**

तुम्हीच पुरोहित व्हा ! आणि आपल्या घरी, शाळेत, गणेश मंडळात श्री गणेशाची अर्थपूर्ण, कालोचीत अशी सार्थ प्रतिष्ठापना करा. **पोथी व CD उपलब्ध ! संपर्क – छात्र प्रबोधन**

**पोथी संकेतस्थळावरही उपलब्ध – www.santrika.org**

# छात्र प्रबोधन

**सौर भाद्रपद, शके १९३५। वर्ष १३ अंक १२**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २५४ वा अंक, वर्ष २२ अंक २

प्रकाशन दिनांक - १० भाद्रपद, शके १९३५/१ सप्टेंबर २०१३


ॐ

***इवली शल्ये रुपती खुपती***
***मात करू दे त्यांच्यावरती***
***प्रगल्भतेचे पंख देऊनी***
***ने ज्योतिर्जगतात***

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| २. | **संवाद** | - महेन्द्र सेठिया |
| ३. | कथा ... **हार की जीत** | - अनु. नीलिमा करमरकर |
| ६. | कविता... **शाळा** | - सुनील पाटील |
| | **वाळवंटी नाचताना** | - चंद्रकांत वानखेडे |
| ८. | माहितीपर...**वेगाचा थरार - फॉर्म्युला वन** | - प्रसाद कुलकर्णी |
| ९. | वाचलेच पाहिजे असे काही ... **हद्दपार** | - शैलजा देशमुख |
| ११. | ललित... **देव कोपला** | - मंदाकिनी गोडसे |
| १४. | विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता... **लेखांक-४** | |
| | **जादुई रूपांतरण** | - वाच. नलिनी गुजराथी |
| १६. | ललित... **कावळे गुरुजी** | - इंद्रजित भालेराव |
| १९. | निर्णयातील स्वावलंबन...८ | |
| | **गटात निर्णय घेताना... २** | - महेन्द्र सेठिया |
| २२. | संस्था परिचय... | |
| | **'टीम निवांत'ची अंधत्वावर मात!** | - मीरा बडवे |
| २५. | मुलांचे पान... **सत्यमेव जयते!** | - चि. शौनक हिंगे |
| | कविता... **गणपती बाप्पा** | - कु. शलाका पोंक्षे |
| २७. | **छात्र प्रबोधन वर्ष १३-अंकातील विशेष लक्षवेधी** | |
| ३०. | **केंद्रप्रमुख संपर्क सूची** | |

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **ईश्वरा...**- कै. नारायण विष्णु गोडसे

**याशिवाय -** शब्दकोडे (५), राज्यस्तरीय स्पर्धेविषयी आवाहन (८), प्रयोग करा (१०), मेंदूला ताण (१३), सर्वांगीण बालविकास शिबिर, अभिनंदन (१५), विज्ञानाच्या चष्म्यातून (१७) विनोद (२१, २४), लेखकाच्या नजरेतून छात्र प्रबोधन (३२)


पानाखालील कवितेच्या ओळी कवयित्री संगीता बर्वे यांच्या आहेत.
पानाखालील तळटिपेत राष्ट्रीय उद्याने-अभयारण्ये यांची माहिती दिली आहे.

**मुखपृष्ठाविषयी -** निसर्गातील विविध माध्यमे ही ईश्वराचीच रूपे आहेत. पानांच्या आकारातून साकारलेली 'श्रीं'ची प्रतिमा हे त्याचेच प्रतीक. पर्यावरणपूरक कृतितून उत्सव साजरे करणे ही ईशसेवाच होय; हा संदेश देण्याचा प्रयत्न या मुखपृष्ठातून केला आहे.

**- ऋजुता घाटे,** rijutaghate@gmail.com


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**

महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**

शिल्पा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**

शैलजा देशमुख

नीलिमा करमरकर

डॉ. कांचनगंगा गंधे

आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ व आतील चित्रे ♦**

ऋजुता घाटे, भरत केतकर

**♦ संपर्क पत्ता ♦**

छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**

www.chhatraprabodhan.org

**ई-मेल**

chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**मासिकाची वर्गणी**

वार्षिक: ₹ १८०/-
द्वैवार्षिक: ₹ ३४०/-
त्रैवार्षिक: ₹ ५००/-
दशवार्षिक: ₹ १,५००/-
**या अंकाची किंमत : ₹ १५ /-**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


राष्ट्राचा ध्वज उंच धरोनी शिखरावरती जाऊ या। वंदे मातरम् गाऊ या, वंदे मातरम् गाऊ या।।

**जरूर पाहा...बांधवगड राष्ट्रीय उद्यान,** इ. स.१९८२,क्षेत्रफळ -४४८.८५ कि.मी.(कटनी, मध्यप्रदेश) वाघांसाठी प्रसिद्ध



**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

संवाद

***स्वयंशिक्षणाच्या वाटेवरील कृतिशील प्रबोधकांनो,***

*या अंकाबरोबरच 'छात्र प्रबोधन' च्या वाटचालीला २१ वर्षे पूर्ण झाली. पहिली आठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर काही तांत्रिक पूर्तता करायच्या राहून गेल्यामुळे छात्र प्रबोधनच्या अंकावर पुन्हा 'वर्ष १ अंक १' असे छापायला सुरुवात करावी लागली. त्यालाही आता तेरा वर्षं पूर्ण झाली (म्हणून या अंकावर वर्ष १३ अंक १२ असे लिहिले आहे.) या २१ वर्षांत एकदाही खंड न पडता दरमहा 'छात्र प्रबोधन'चा अंक प्रकाशित होत गेला. त्यामुळे एकुणातला हा २५२ वा अंक! (२१ वर्षे गुणिले १२ अंक)*

*'छात्र प्रबोधन' च्या मुखपृष्ठावर एक वाक्य कायम असतं. कोणतं माहीत आहे? नसेल तर या अंकाचं मुखपृष्ठ पाहून सांगा बरं! **'ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक.'** याबरोबरच 'अंतरंग' च्या (म्हणजेच अंकाचं पहिलं पान) पानावरही सर्वात खाली एक वाक्य नेहमी छापलेलं असतं, कोणतं? पाहा बरं! **'छात्र प्रबोधन: निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!'** याचा अर्थ हे मासिक निव्वळ मनोरंजनासाठी, जाता जाता वाचून ठेवून देण्यासाठी, रद्दीत टाकण्यासाठी निश्चितच छापलेलं नाही. मासिकाच्या वाचनातून मनोरंजन होईल, साहित्याची-वाचनाची गोडीही वाढेल; पण त्याबरोबर स्वत:चे स्वत: शिकण्याला, स्वयं-विकासाला चालना देणाऱ्या अनेक गोष्टी, लेख, लेखमाला, विशेषांक, स्पर्धा, आवाहने 'छात्र प्रबोधन'ने आजपर्यंत प्रसिद्ध केली. त्याचा वापर तुमच्यापैकी किती जणांनी करून घेतला?*

*आत्ताची शिक्षणपद्धती ही गृहपाठापुरता आणि परीक्षेपुरता अभ्यास करायला लावणारी पद्धती आहे. जे शिकायचं ते कोणाकडून तरी प्रत्यक्षच शिकलं पाहिजे; 'तुमचं-तुम्हाला' शिकताच येणार नाही असं वातावरण निर्माण करणारी पद्धती आहे. 'काय शिकायचं' ते तुमच्यासाठी दुसरंच कोणीतरी ठरवणार. 'ते आणि तेवढंच शिका' अशी सांगणारी ही रचना आहे. त्यात भर म्हणून की काय माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीने आपल्यापैकी अनेकांचा भरपूर वेळ खाल्ला आहे. टीव्हीलाही मागे टाकतील अशा मोबाईल, संगणक, इंटरनेट या गोष्टींनी आपलं विश्व व्यापून टाकलंय. ते स्वयं शिक्षणाचं चांगलं साधन असलं तरी त्याचा वापर मनोरंजन, टाइम-पास, फुटकळ संवाद आणि तकलादू मैत्रीसाठीच जास्त होताना दिसतोय. क्रीडांगणावरचे मैदानी खेळ, व्यायाम, नवीन वाचन, हातांनी काही करून पाहणं, स्वत:हून काही शिकणं, गटामध्ये काम करणं, नवनवीन जबाबदाऱ्या घेणं, आव्हाने स्वीकारणं, धडपडणाऱ्या व्यक्तिंच्या सहवासात राहाणं, वेगळे अनुभव घेणं, संकल्प करून ते पूर्ण करणं, आपल्या आसपास घडणाऱ्या घडामोडींचा अभ्यास करणं, त्याला प्रतिसाद देणं हे सगळं कुठंतरी हरवतंय का? याची गरज वाटत नाहीये, की हे करायला वेळ मिळत नाहीये, की हे कसं करायचं हे सांगायला कोणी नाहीये?*

*माझ्या लाडक्या प्रबोधकांनो, गावोगावच्या विद्यार्थ्यांनो, हे सगळं करणं म्हणजे खरं शिक्षण, खरा व्यक्तिमत्त्व विकास आहे हे तुम्ही पक्कं लक्षात ठेवा. त्यासाठी तुम्हाला वेळ काढावाच लागेल, वेळेचं नियोजन करावंच लागेल. आणि कसं करायचं हे सांगायला 'छात्र प्रबोधन' आहे ना! पुढचा काळ हा स्वयंशिक्षणाचा काळ आहे आणि 'छात्र प्रबोधन' हे त्यासाठी एक उत्तम साधन आहे. अर्थात जो त्याचा तसा वापर करेल त्याच्यासाठी ! तसं व्हावं, याची सतत जाणीव तुम्हाला आणि आम्हालाही होत राहावी म्हणून तर 'ती' २ वाक्ये दर अंकात आपण जाणीवपूर्वक छापत असतो.*

*'छात्र प्रबोधन'च्या बावीसाव्या वर्षात तुमच्यापैकी अनेक वाचक, विद्यार्थी या दिशेने 'छात्र प्रबोधन'चा उपयोग करतील, वेळोवेळी केलेल्या आवाहनांना, कृतिंना प्रतिसाद देतील. अंकातून नवीन काय हवंय ते सुचवतील अशी अपेक्षा आणि विश्वास बाळगून आहोत.*

*छात्र प्रबोधन हे मुक्त शिक्षणाचं विद्या केंद्र आहे. वार्षिक वर्गणी भरून तुम्ही या विद्याकेंद्रात प्रवेश घेतलाय. आता खऱ्या अर्थाने या अंकाचा वापर करून स्वत: समृद्ध व्हा, अनेकांना समृद्ध करा!*

*त्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!*

**सस्नेह तुमचा,**



**(महेन्द्र सेठिया)**



जातीपातीला मोडू या, बंधुत्वाला जोडू या । संघर्षाला गाडून आपण अणुयुगाला सांधू या ।।



**जरूर पाहा... बंदीपूर राष्ट्रीय उद्यान**, इ. स.१९७४, क्षेत्रफळ-८७४.२० कि.मी. (गुंदलुपेट, कर्नाटक)वाघांसाठी प्रसिद्ध

**प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.**

# हार की जीत

**अनु. नीलिमा करमरकर**



आईला आपल्या मुलाला बघून जसा आनंद होतो, शेतकऱ्याला आपलं डोलणारं हिरवंगार शेत बघून जसा आनंद होतो तसा आनंद बाबा भारती यांना त्यांच्या घोड्याला बघून होत असे. देवाची पूजाअर्चा, भजन वगैरे करून उरलेला वेळ ते घोड्याच्या तैनातीत घालवत. तो घोडा होताही चांगला तगडा आणि देखणा. त्याच्यासारखा घोडा साऱ्या पंचक्रोशीत कोणाकडे नव्हता. बाबा भारती त्याला 'सुलतान' नावाने हाक मारत. त्याचा खरारा करणं, दाणापाणी देणं सर्व ते स्वत:च करीत असत. त्याला पुन्हा पुन्हा न्याहाळण्यात त्यांना धन्यता वाटे. त्यांनी आपली धनदौलत, जमीनजुमला सर्वकाही सोडून दिलं होतं. शहरी जीवनाचा त्यांना तिटकारा होता. गावाबाहेर एका छोट्या मंदिरात ते राहत. भजनपूजन करत.

''मला कोणत्याही गोष्टीचा मोह नाही; परंतु मी सुलतानशिवाय राहू शकणार नाही'', असं ते म्हणत. त्याची चाल, दौड यावर फिदा होऊन ते म्हणत,

''काळ्या ढगांना बघून मोर जसा नाचतो, त्या मोरासारखी डौलदार, माझ्या सुलतानची चाल आहे.'' रोज संध्याकाळी सुलतानच्या पाठीवर मांड ठोकून आठ दहा मैल चक्कर मारल्याविना त्यांना चैन नसे.

त्या भागात खड्गसिंह नावाचा एक डाकू होता. त्याचं नाव घेताच लोक थरथर कापायचे. त्याच्या कानावर एक दिवस सुलतानची कीर्ती गेली. तो सुलतानला बघण्यासाठी अधीर झाला होता. एके दिवशी दुपारी तो बाबा भारती यांना भेटायला गेला. त्यांना नमस्कार करून त्यांच्यासमोर बसला. बाबांनी विचारलं,

''काय खड्गसिंह, कसं काय चाललंय?''

खड्गसिंह म्हणाला, ''आपल्या कृपेनं सर्व ठीक आहे.''

''इथे कसं काय येणं केलंस?'' बाबांनी विचारलं.

''सुलतानला बघण्याची इच्छा मला इकडे घेऊन आली.''

''फार वेगळंच जनावर आहे ते, बघून मन प्रसन्न होईल,'' बाबा म्हणाले.

''मी पण सुलतानबद्दल खूप ऐकून आहे.'' खड्गसिंह म्हणाला.

''त्याची चाल मन मोहून टाकणारी आहे.''

''ऐकलंय की रूपानं पण देखणा आहे.''

''अरे, काय सांगू तुला? त्याला बघणाऱ्या व्यक्तीच्या मनात तो जणूकाही कायमचं घर करतो,'' बाबा उत्साहानं म्हणाला.

''खूप दिवस सुलतानला बघायची इच्छा होती; आज योग जुळून आला.''

बोलत बोलत बाबा आणि खड्गसिंह दोघं तबेल्यात गेले. बाबांनी अभिमानाने आपला घोडा दाखवला. खड्गसिंह बघतच राहिला. त्याने आजपर्यंत शेकडो घोडे बघितले होते; पण असं देखणं जनावर त्यानं प्रथमच पाहिलं. त्याच्या मनात विचार आला,

''या साधूला घोड्याचा काय उपयोग?''

त्याच्या मनात चलबिचल होऊ लागली. तो अधीरतेनं म्हणाला,

‘‘या घोड्याची दौड कशी आहे हे एकदा बघायलाच हवं.’’

प्रत्येकालाच दुसऱ्या व्यक्तीच्या तोंडून आपली किंवा आपल्या एखाद्या वस्तूची स्तुती केलेली आवडते. बाबा भारतीने घोड्याला सोडले, त्यावर मांड ठोकली अन् घोडा जणू वाऱ्याच्या गतीने दौडू लागला. खड्गसिंहचे डोळे आश्चर्याने विस्फारले. शेवटी तो डाकू होता आणि जी वस्तू आवडेल ती आपली झालीच पाहिजे असा त्याचा खाक्या होता. हवं ते प्राप्त करण्याची शक्ती आणि साधनं दोन्ही त्याच्याजवळ होती. तिथून परत जाताना तो निश्चयाने म्हणाला, ‘‘बाबा, हा घोडा मी आज ना उद्या घेऊन जाणारच.’’

झालं! बाबा भारती घाबरले. रात्री त्यांच्या डोळ्याला डोळा लागेना. रात्रभर तबेल्यात राखणीला बसायचे. खड्गसिंहची भीती मनात ठाण करून बसली. असे कित्येक महिने आले नि गेले; पण खड्गसिंह काही फिरकला नाही. आता बाबा भारती काहीसे निश्चिंत झाले. आपण उगाचच इतके घाबरलो होतो, असं त्यांना वाटू लागलं. एकदा एका संध्याकाळी घोड्यावर स्वार होऊन रपेट मारायला निघाले. बाबा मोठे आनंदी अन् प्रसन्न होते. मधूनच घोड्याचं रंगरूप बघून कौतुकाने त्याला थाप मारत होते. इतक्यात जरा कोपऱ्यातून खोलवर आवाज आला,

‘‘बाबा, या गरीब दुबळ्याला जरा मदत करा.’’

करुणापूर्ण आवाजात केलेली याचना ऐकून बाबांनी घोडा थांबवला. बघितलं तर एक लुळा पांगळा माणूस झाडाखाली पडून कण्हत होता. बाबा म्हणाले,

‘‘अरे, तुला काय होतंय?’’ त्यावर तो अपंग हात जोडून म्हणाला, ‘‘महाराज, माझ्यावर दया करा. इथून तीन मैलावर रामपूर गाव आहे. मला घोड्यावरून तिथपर्यंत पोचवा. देव तुमचे कल्याण करेल.’’

बाबा म्हणाले, ‘‘रामपूरमध्ये तुझं कोण आहे? तिकडे कशाला जात आहेस?’’

तो म्हणाला, ‘‘दुर्गादत्त वैद्यांचं नाव तुम्ही ऐकलं असेलच. मी त्यांचा सावत्र भाऊ आहे. उपचारासाठी त्यांच्याकडे जायचे आहे.’’

बाबा भारती दुर्गादत्त वैद्यांचं नाव ऐकून झटकन खाली उतरले. अपंग माणसाला कसंबसं घोड्यावर बसवलं. घोड्याचा लगाम स्वत:च्या हातात घेऊन हळूहळू चालू लागले. अशा प्रकारे संथपणे थोडी वाटचाल केल्यावर त्यांच्या हाताला एकदम झटका बसला अन् लगाम हातातून निसटला. बाबांनी बघितलं तर क्षणार्धात तो पांगळा माणूस घोड्यावर सरसावून बसला, लगाम हातात घेऊन त्याने घोड्याला टाच मारली. बाबा भारतींच्या चेहऱ्यावर आश्चर्य, दु:ख, भीती असे सर्व भाव तरळून गेले. ते ओरडू लागले. तो दीनदुबळा माणूस म्हणजे खड्गसिंह होता. बाबांनी सर्व शक्ती एकवटली अन् ते जोरात ओरडले,

‘‘जरा थांब.’’

आवाजातील जरब ऐकून घोडा थांबवला गेला. खड्गसिंह घोड्याच्या मानेवर प्रेमाने हात फिरवत म्हणाला,

‘‘बाबा, आता हा घोडा माझा झाला, तुम्हाला तो मिळणार नाही.’’

‘‘जातोच आहेस तर माझी एक गोष्ट ऐक,’’ बाबा म्हणाले. बाबा भारती खड्गसिंहाच्या जवळ गेले. त्याच्या डोळ्यांत बघत म्हणाले, ‘‘आता हा घोडा तुझा झाला आहे. ‘तो परत दे’ असं मी कदापि म्हणणार नाही. परंतु मी तुला एक विनंती करतो. ती मान्य केली नाहीस तर मात्र मला फार दु:ख होईल.’’

खड्गसिंह म्हणाला, ‘‘बाबा, तुम्ही नुसती आज्ञा करा. मी तुमचा दास आहे. घोडा सोडून इतर काहीही मागा.’’

‘‘आता घोड्याचं नावसुद्धा घेऊ नकोस. या विषयासंदर्भात माझं काही मागणं नाही. माझी विनंती इतकीच आहे की, या घटनेची वाच्यता कोणासमोर करू नकोस, गुप्त ठेव.’’

खड्गसिंह चकित झाला. त्याला वाटलं होतं, की घोड्याला घेऊन पळून जावं लागेल. इथे तर बाबांनी त्याला घोडा देणं मान्य केलं होतं. असं करण्यात बाबांचा काय हेतू असेल? खड्गसिंह यावर विचार करून थकला. त्याने बाबांना



राजा सूर्यदेवा तुला माझा नमस्कार । तुझ्या प्रकाशाने हसे माझे घरदार ।।

**जरूर पाहा... जिमकार्बेट राष्ट्रीय उद्यान**, इ.स.१९३६,क्षेत्रफळ-१३१८.५ कि.मी. (रामनगर, उत्तराखंड)वाघांसाठी प्रसिद्ध

**प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६**

विचारलं, ''तुम्हाला लोकांची भीती वाटतेय का?''

हे ऐकून बाबांनी उत्तर दिलं, ''ही घटना जर लोकांना समजली तर ते दीन-दुबळ्यांना कधीही मदत करणार नाहीत. हा प्रसंग आठवतील आणि अपंगांकडे अविश्वासाने पाठ फिरवतील.'' बोलता बोलता बाबांनी तोंड फिरवलं आणि मंदिराच्या दिशेने ते चालू लागले. जणू काही त्यांचा सुलतानशी काही संबंधच नव्हता.

बाबा भारती लांबवर गेले; परंतु त्यांचे बोल खड्गसिंहच्या कानात घुमत राहिले. त्याच्या मनात आले, 'बाबांचे विचार किती उच्च आणि पवित्र आहेत. खरं तर सुलतानवर त्यांचं जिवापाड प्रेम आहे. परंतु त्याला सोडून जाताना त्यांच्या चेहऱ्यावर जरासुद्धा दुःखाची छटा नव्हती. बाबांना वाईट वाटत होतं ते एवढ्यासाठी की, यापुढे दीन-दुबळ्यांना कोणी मदत करणार नाही, त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. खरंच, बाबा म्हणजे साक्षात परमेश्वर आहेत.'

त्याच रात्री खड्गसिंह सावधानतेने बाबांच्या मंदिरात गेला. सर्वत्र शांतता होती. सुलतानला घेऊन तो हळूहळू तबेल्याकडे गेला. बाबांना आता सुलतानच्या चोरीची भीती नसल्याने फाटक उघडेच होते. खड्गसिंहने घोड्याला त्याच्या नेहमीच्या जागी बांधले अन् फाटक हलकेच बंद करून घेतले. हे सर्व करताना त्याच्या डोळ्यांत पाणी तरळत होतं. पण ते अश्रू सचोटीचे होते.

पहाट झाली. रोजच्याप्रमाणे स्नान वगैरे उरकल्यावर नेहमीप्रमाणे बाबांचे पाय तबेल्याकडे वळले. परंतु लगेचच तबेल्यात सुलतान नसेल हे आठवून ते उलटे फिरले. त्याच्या आठवणीने त्यांना अतिशय वाईट वाटले, थोडावेळ काहीच सुचेना, ते तेथेच थबकले.

आतमध्ये सुलतानला बाबाजींची चाहूल लागली. त्यांच्या पावलांचा आवाज त्याने ओळखला आणि तो आनंदाने खिंकाळला. बाबा भारती आश्चर्याने धावतच आत गेले. प्रेमाने सुलतानला मिठी मारून ते रडू लागले. आपलं हरवलेलं मूल खूप दिवसांनी भेटल्यावर त्याच्या बापाची जशी अवस्था होते तशीच बाबांची झाली. ते सारखे त्याच्या पाठीवरून मायेनं हात फिरवत होते, त्याला चुचकारत होते.

आता ते अतीव आनंद आणि समाधानाने उद्गारले,

''आता कोणीही दीनदुबळ्यांवर अविश्वास दाखवून त्यांच्याकडे पाठ फिरवून निघून जाणार नाही.''

•••

**मूळ हिंदी कथा - सुदर्शन**
**स्वैर अनुवाद - निलिमा करमरकर**
ब-शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता,
पुणे ४११००४

## सोडवा हे वैशिष्ट्यपूर्ण शब्दकोडे


**सोबतचे कोडे सोडवताना...**

**१. कोड्यातील उभ्या-आडव्या शब्दांना काना, मात्रा, वेलांटी नाही.**

**२. क्र.१ व ४, ३ व ५ आणि २ या क्रमांकाचे उभे व आडवे शब्द सारखेच आहेत.**

**३. हे शब्द ओळखण्यासाठी खाली काही क्लृप्त्या दिल्या आहेत.**

- वारकऱ्यांनी केलेला विठ्ठलाचा जयघोष
- याची पूजा सर्वप्रथम
- ओरडणे, रडणे







परमुलखाला जाऊ या, पुन्हा परतुनी येऊ या । या देशाच्या सरस्वतीला सन्मानाने वंदू या ।।

**जरूर पाहा... दुधवा राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९७७, क्षेत्रफळ-४९०.२९ कि.मी. (पिलभित, उत्तरप्रदेश)

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**

# शाळा




आजही आठवते
गावाकडची शाळा
खिडकीतून दिसणारा फुललेला मळा ।

मास्तरांची शिस्त
टेबलावरची छडी
शिकवण्याची ती हौस बडी ।

शाळेसाठी शहराकडे
धावू लागल्या गाड्या
मातीच्या भिंती पडून उभ्या राहिल्या माड्या ।

कुचक्या पानांसारखी
झडत चालली मूल्यं
कित्येकांना साधे जाणवत नाही शल्य ।

हरवली ती शाळा
हरवले ते मास्तर
फाटक्या अनुभवांना जोडतोय अस्तर ।

मनातल्या मनात
भरत असते शाळा
जुन्या आठवणीने रंगून जातो फळा ।

**– सुनील पाटील**
इमेज ॲकॅडमी, संजीवनी संकुल, गोळे कॉलनी,
अशोक स्तंभ, नाशिक ४२२००२

---

# वाळवंटी नाचताना



असा कसा हा कळस
पाया माऊली रोविला
धन्य धन्य 'तुकारामा'
'गुरू' विश्वाचा जाहला ।।

गाथा पाण्यात टाकूनी
कुणी तरले म्हणाले
शब्द ब्रम्हांडाचा स्वामी
विश्व तारले म्हणाले ।।

तूच नामयाची वाटी
तूच संस्काराची माती
गोरा सावता तुझ्यात
तूच पेटविल्या ज्योती ।।

विश्व वेदनेची गाथा
डोई घेऊन निघालो
वाळवंटी नाचताना
मीच 'तुकाराम' झालो ।।

**– चंद्रकांत वानखेडे,** शिवश्रद्धा बी– २, तळमजला, वडगाव बु., पुणे ४११०४१



पंख परीचे मला लाभू दे ,एकदाच देवा । जाईन मीही आभाळातून, दूर दूर गावा ।।



**जरूर पाहा... गंगोत्री राष्ट्रीय उद्यान,** इ. स. १९८९, क्षेत्रफळ-१५५२.७३ कि.मी. (गंगोत्री, उत्तराखंड)

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

# वेगाचा थरार - फॉर्म्युला वन

– प्रसाद कुलकर्णी




**१३** मे १९५० सिल्व्हरस्टोन सर्कीटवर २६ गाड्या सज्ज होत्या. निशाण फडकवताच शर्यत सुरू झाली आणि त्याबरोबरच सुरू झाला संपूर्ण जगावर मोहिनी घालणारा थरारक वेगाचा खेळ–**फॉर्म्युला वन.**

वास्तविक या आधीदेखील फॉर्म्युला वनच्या शर्यती होत असत; परंतु त्यांचे स्वरूप विस्कळीत असे. तथापि या शर्यतीपासून वर्ल्ड चॅम्पियनशिपला सुरुवात झाली आणि त्यानंतर खेळाला एक प्रमाणबद्ध स्वरूप मिळाले. तेव्हापासून या खेळाचे गारूड जगावर आपला प्रभाव टिकवून आहे. किंबहुना उत्तरोत्तर तो वाढतच आहे.

मनुष्यप्राण्याला सुरुवातीपासूनच वेगाचे आकर्षण. त्यामुळे ताशी २५०–३५०किमी. वेगाने धावणाऱ्या गाड्यांच्या खेळाने त्याला भुरळ पाडली नसती तरच नवल. 'जमिनीवर धावणारे विमान' असादेखील काहीजण याचा उल्लेख करतात. तो बऱ्याच अंशी खरादेखील आहे. कारण एरोडायनॅमिक्स हाच या सर्वांचा पाया आहे. एरोडायनॅमिक्स ही एक विज्ञानशाखा आहे. फॉर्म्युला वन कार तयार करताना हवेचा दाब व गाडीचा वेग याचे संतुलन राखण्यात या तंत्राचा फार मोठा उपयोग होतो. सर्वसाधारणपणे चॅम्पियनशिप दोन विभागात असते. ड्रायव्हर आणि कन्स्ट्रक्टर. कन्स्ट्रक्टर हे आपल्या संघाची कार बांधणी, त्याची निगा राखणे ही कामे करतात. त्यात जास्तीत जास्त सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात.

आता थोडे शर्यतीविषयी बोलूया. प्रत्येक ग्रँड प्रिक्स अर्थात मुख्य शर्यत प्रामुख्याने तीन दिवस चालते. शुक्रवार, शनिवार आणि रविवार (अपवाद वगळता मोनॅको ग्रां. पी. गुरुवारी चालू होते.) शुक्रवारी दुपारी पात्रता फेरी असते यात सर्वोत्तम खेळ नोंदविणारा, मुख्य शर्यतीसाठी 'पोल पोझिशन' मिळवतो. पात्रता फेरीत एका फेरीसाठी सर्वोत्तम वेळ नोंदविणारा खेळाडू मुख्य स्पर्धेत, रांगेत सगळ्यात पुढे असतो यास 'पोल पोझिशन' मिळविणे असे म्हणतात. रविवारी मुख्य शर्यत असते.

अर्थात अशा या वेगवान खेळाला अपघाताचं देखील गालबोट लागलं आहे. १ मे १९९४ रोजी सॅन मरिनो शर्यतीमध्ये तीन वेळचा विश्वविजेता व जगप्रसिद्ध ब्राझीलियन ड्रायव्हर आयर्टन सेन्ना यांचे अपघातात निधन झाले. त्याच्या आधीच्या दिवशीच म्हणजे ३० एप्रिल १९९४ रोजी रोनाल्ड रँटझनबर्गर हा खेळाडूदेखील पात्रता फेरीत झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडला. संपूर्ण फॉर्म्युला वनचं विश्व या दोन अपघातांनी ढवळून निघालं. खेळावर बंदीचीदेखील मागणी येऊ लागली. परंतु यानंतर फेडरेशन इंटरनॅशनल ॲटोमोबाइल (एफ. आय. ए.) ने सुरक्षाविषयक नियम एकदम कडक केले व एकंदर प्रणालीत आमूलाग्र बदल केले. फेडरेशन इंटरनॅशनल ॲटोमोबाइल (FIA) हा फॉर्म्युला वन मधील सर्व महत्त्वाचे निर्णय, सुरक्षिततेबाबतचे नियम यांची अंमलबजावणी करतो. त्यामुळे त्यानंतर आजतागायत कोणी शर्यतीदरम्यान अपघातात मृत्यू पावले नाही.

एकूण, आयर्टन सेन्नाच्या मृत्यूनंतर फॉम्युला वन बदलले. किंबहुना त्यानंतरच फॉर्म्युला वनचा सुवर्णकाळ चालू झाला, असे म्हणता येईल. त्याचे संपूर्ण श्रेय जाते सात वेळचा जगज्जेता व फॉर्म्युला वनच्या इतिहासातील जर्मनीचा सर्वोत्तम ड्रायव्हर मायकेल शूमाकर याला. त्याने आपल्या अद्वितीय खेळाच्या जोरावर फॉर्म्युला वनला एका वेगळ्याच

उंचीवर नेऊन ठेवले. शूमाकर व फेरारी ही जोडीदेखील अजरामर झाली. शूमाकरच्या निवृत्तीनंतर या खेळाला उतरती कळा लागेल की काय अशी शंका वाटत असतानाच सेबॅस्टीयन व्हेटेलचा उदय झाला. शूमाकरचाच देशबांधव असलेल्या व्हेटेलने आपणच त्याचा खरा वारसदार असल्याचं सलग तीन वेळा विश्वविजेतेपद मिळवून सिद्ध केलंय. अर्थात त्याला जात्याच लढवय्या असणाऱ्या स्पेनच्या फर्नांडो अलोन्सोचं कडवं आव्हान झेलावं लागतंय. यावर्षीदेखील या दोघांतच खरी चुरस रंगली आहे.

भारत या खेळात फारसा पुढे नाही. क्रिकेटव्यतिरिक्त दुसऱ्या खेळाकडे आपलं विशेष लक्षच जात नाही. त्यामुळे फॉर्म्युला वनमध्ये आपला सहभाग फार उशीरा झाला. अलीकडे विजय मल्ल्या यांनी घेतलेला फोर्स इंडिया हा संघ व नरेन कार्तिकेयन हा ड्रायव्हर हीच काय ती भारताची जमेची बाजू. परंतु २०११ मध्ये दिल्लीत बुद्धा सर्कीटवर भारतातील



पहिली शर्यत झाली व तिला अभूतपूर्व असा प्रतिसाद देखील मिळाला. म्हणजे यापुढे भारतातील या खेळाचे चित्र आशादायक आहे, असं मानायला हरकत नाही.

●●●

**– प्रसाद कुलकर्णी**
लेन नं. ८, साई सत्यम पार्क, नगर रस्ता, वाघोली, पुणे
e-mail- imkulkarniprasad@gmail.com

## छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण, राज्यस्तरीय, सांघिक स्पर्धा

**(इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी, प्रवेश नि:शुल्क)**

१. **‘माझा गाव/ शहर’ या विषयावर ‘स्लाईड शो’ (PPT) निर्मिती स्पर्धा –** (३ जणांचा गट)
तुमच्या गावाचा इतिहास, भूगोल, निसर्ग, माणसे, संस्था, लोकजीवन, दर्शनीय स्थळे, व्यवसाय यापैकी एक वा अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी दाखविणारा तुमच्या गावाचा/शहराचा स्लाईड शो मराठीतून तयार करण्याची स्पर्धा. (२०ते२५ स्लाईडस्)

२. **भारतीय भाषांमधील स्फुर्तिगीत समुह गायन स्पर्धा –** (५ ते ७ जणांचा गट)
आपल्या नोटेवर छापलेल्या कोणत्याही भारतीय भाषेतील (हिंदी, मराठी, संस्कृत सोडून) राष्ट्रभक्तीपर गीतांची समुहगायन स्पर्धा (गीताच्या भावार्थ व रसग्रहणासह)

३. **‘तुम्हीच संपादक व्हा’ – हस्तलिखित स्पर्धा –** (५ ते ८ जणांचा गट)
५० पृष्ठसंख्या असलेले हस्तलिखित हवे. निम्मा भाग विशिष्ट विषयाला धरून तर निम्मा भाग मुक्त! याशिवाय काही गोष्टी प्रत्येक हस्तलिखितात हव्याच!

स्पर्धांची नावनोंदणी **‘छात्र प्रबोधन’**च्या ई मेलवर / पत्राद्वारे **३१ डिसेंबर २०१३** पूर्वी करणे आवश्यक.
तपशीलासाठी छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर (chhatraprabodhan.org) अवश्य भेट द्या.
मुख्य कार्यालयात संपर्क साधा.

**साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१४**

**पहिल्या तीन क्रमांकांना आकर्षक बक्षिसे, विशेष गुणवत्ता प्राप्त सर्वांना प्रशस्ती पत्रके**



मेघ पांगला नभात आणि मनात दाटला । त्याच्या मायेचा गारवा, साऱ्या देहात साठला ।।



**जरूर पाहा: गोविंद पशू विहार राष्ट्रीय अभयारण्य,** इ.स.१९९०, क्षेत्रफळ-४७२.०८कि.मी. (उत्तराखंड) हिमालयीन चित्त्यासाठी

**प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.**

**वाचलेच पाहिजे असे काही**
*ज्येष्ठ संवेदनशील साहित्यिक श्री. ना. पेंडसे यांच्या जन्मशताब्दी-वर्षानिमित्त त्यांचा पुस्तकाचा परिचय.*

मराठी कादंबरीच्या इतिहासात ज्यांच्या साहित्याची आवर्जून दखल घ्यायला हवी असे एक लेखक म्हणजे श्री. ना. पेंडसे ! समाजजीवनाचे वास्तववादी दर्शन, माणसामाणसातील भावबंध, नात्यातील ताणेबाणे याचं चित्रण हे त्यांच्या कादंबऱ्यांचं वैशिष्ट्य! त्यातील एक अविस्मरणीय कादंबरी म्हणजे 'हद्दपार'. १९५० साली प्रथम प्रकाशित झालेली ही कादंबरी आज ६३ वर्षांनंतरही तितकीच वाचनीय वाटते. आतापर्यंत तीन आवृत्त्या व सात वेळा पुनर्मुद्रण होण्याचं भाग्य या कादंबरीला लाभलं.




ही कथा आहे कोकणातील एका गावाची ! तेथील समाजजीवनाची ! गावावर प्रेम करणाऱ्या सामान्यातल्या असामान्य अशा एका मास्तरांची-राजे मास्तरांची ! जोपर्यंत मुलं शाळेत शिकतायत तोपर्यंत गुरु-शिष्यांमधले भावबंध चिरकाल टिकणारे असल्यामुळे आज शाळांचं रूप बदललं, शिक्षणपद्धती बदलली तरी ही कथा कुठल्याही काळात, कोणालाही खास आपल्या हृदयाजवळची आहे असंच वाटतं.

खास कोकणी वातावरणाचा गंध असणारी ही कादंबरी ! दुर्गेश्वर बुरोंडीसारख्या छोट्या खेड्यातले राजेमास्तर यांची ही कथा ! इनामदार घराण्यात जन्मलेल्या एका मुलाने घराण्याच्या परंपरेला तडा देत मास्तरची नोकरी पत्करली. आणि गावातील प्रत्येक शाळकरी मुलाशी प्रेमाचे नाते जोडले. लहानपणापासून माणसांतले हलके-मोठे असे जातीचे भेद न मानणारा हा मुलगा मनाचे निरागसपण जपत आयुष्यभर मूल्यांना जपत राहिला. म्हातारपणी संध्याकाळी देवळाच्या वाटेने जाणाऱ्या मास्तरांचं वर्णन करताना लेखक म्हणतात, 'गावातील सधन गृहस्थ महादेवनाना असोत वा त्यांच्या दारचा सदू गडी असो, कुणीही भेटलं तरी मास्तर त्यांची चौकशी करणारच ! कारण दोघेही केव्हातरी त्यांच्या हाताखाली होते. आणि त्यांच्या हातची छडी खाणारा विद्यार्थी निरंतरचा त्यांचा होत असे.'

मास्तर खरं तर खूप प्रखर बुद्धीचे, बहुश्रुत, व्यासंगी अध्यापक नव्हते. मग काय वेगळेपण होतं त्यांच्यात? एक स्वतंत्र जग निर्माण करण्याची प्रतिभा मास्तरांजवळ होती. मुलांच्या मानसिक पातळीवर येणं हा त्यांच्या हातचा मळ होता. आपला दरारा कायम ठेवूनही मास्तर मुलांशी एकरूप होत असत. या किमयेच्या बळावर मुलांचं स्वर्गतुल्य जग त्यांनी अक्षरश: पादाक्रांत केलं होतं. अभ्यासात गफलत झाली तर ते रुद्ररूप धारण करत; पण एरवी अतिशय हळवं मातृहृदय असणारे मास्तर एखाद्या मुलाला शिक्षा करावी लागली तर हळहळत असत. ते प्रत्येक मुलाशी मनमोकळ्या गप्पा मारत. त्यामुळे प्रत्येकाची खडा न् खडा माहिती मास्तरांना असे.

गावातील होळीच्या उत्सवाला चांगलं रूप देणं; गावातील भांडणं सोडवणं यात मास्तरांचा सहभाग असे. मुलांना सहलीला घेऊन जायचं आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण दद्यायचं ही स्वत:ची खास शिक्षणपद्धती अवलंबण्यासाठी मास्तर मुलांना सहलीला घेऊन जात. घरात अठरा विश्वे दारिद्र्य असलं तरी सहलीच्या वेळी पदरखर्चाने ते गरीब मुलांसाठी पानग्या, चटणी घेऊन जातात. गरीब, श्रीमंत सगळ्यांनी एकत्र खाण्याचा अनुभव सहलीत मुलांना मिळतो. जणू कृष्णाचा गोपाळकालाच ! हर्णे बंदरात मुलांना ते बोट दाखवायला नेतात. उंचावरून नदीचा उगम कसा होतो, नदी कशी तयार होते; नदीचं मुख, खाडी म्हणजे काय, भरती-ओहोटी, समुद्रधुनी कशाला म्हणतात अशा अनेक गोष्टी मास्तर मुलांना अनुभवातून शिकवतात. या अनुभवाचं वर्णन करताना



वृक्षवल्लरीतुनी समीर मंद वाहतो । पुष्पगंध प्राशुनी वसंत धुंद डोलतो ।।

**जरूर पाहा: ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान**, इ.स.१९८४, क्षेत्रफळ-७५४.४० कि.मी.(हिमाचलप्रदेश)हिमालयीन पक्षी, अस्वलांसाठी



**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**

लेखक म्हणतात, 'साऱ्या निर्जीव व्याख्यांनी आज सजीव रूप धारण केलं होतं. शिक्षणातील उपरेपण गेलं होतं. जिवलग मित्रासारखं ते मुलांत मिसळून गेलं.'

लंब्या जोशीसारख्या विक्षिप्त वाटणाऱ्या जिज्ञासू मुलाचं मास्तर कौतुक करतात. त्यामुळेच डॉ. लंबोदर जोशी हा संशोधक घडतो. मास्तरांच्या एकसष्टीचा समारंभ आजी-माजी विद्यार्थी उत्स्फूर्तपणे साजरा करतात त्यावेळी डॉ. जोशींचं व्याख्यान खूप बोलकं - ''माझ्या संशोधनाचं कौतुक लंडनला जेव्हा झालं त्यावेळी एक काटकुळा देह माझ्या नजरेसमोर नाचत होता. तो होता बुरोंडीच्या राजेमास्तरांचा! माझ्या आजच्या यशाचा पाया माझ्या काजव्याच्या बॅटरीचं कौतुक करणाऱ्या एका गरीब शिक्षकाने घातला आहे. तेव्हा मी लंब्या होतो. 'मी हुशार आहे' असं म्हणणारा एकमेव गृहस्थ म्हणजे मास्तर ! लहानपणी मला पुष्कळवेळा वाटे, आपण अगदी 'हे' आहोत. हा न्यूनगंड घालवण्याचं काम मास्तरांनी केलं. माझी कोणतीही शंका त्यांनी हसण्यावारी नेली नाही. एकदा समुद्रावरून येताना 'काळोखात लाटा का लकाकतात?' या माझ्या प्रश्नाचंही मास्तरांनी कौतुक केलं. 'लंब्या, तुझी शंका चांगली आहे; पण मलाही याचं उत्तर माहीत नाही. मी तपास करून तुला सांगेन!' मास्तरांच्या या प्रोत्साहनाने आज लंब्याचा डॉ. लंबोदर झालाय.

असे हे मास्तर ! आपल्या कर्तव्याशी ते सदैव प्रामाणिक राहिले. त्यांचा हा प्रामाणिकपणा गावाला शेवटी कळतो. घरातील दारिद्र्य, मुलाचा अकाली मृत्यू यामुळे मास्तरांची व त्यांच्या पत्नीची होणारी ओढाताण, गावातील जातीयवादाचं राजकारण, कोकणी माणसांचा इरसालपणा याचं दर्शन कादंबरीत पानोपानी राहातं. पण त्याचबरोबर इनामदारांशी सदैव इमानदार राहणारी म्हांबरी, कुणब्यांना समाजात मान मिळावा यासाठी झटणारा निर्मल, मास्तरांवर प्रेम करणारे नाना अशी चांगल्याची जाण असणारी माणसेही भेटतात. शेवटी तत्त्वासाठी मास्तर नोकरीचे त्यागपत्र देतात. आणि दुर्गेश्वराबाहेरील राजेवाड्याची वाट धरतात. या प्रसंगाने मनाला चटका लावत कादंबरी संपते. संपूर्ण कादंबरीत चित्रदर्शी वर्णनामुळे कोकणातील निसर्ग हाही कादंबरीतील एक अविभाज्य पात्र बनते. कोकणातील एका लहानशा गावात घडणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर कथानक फुलत जाते पण मनात रेंगाळत राहते ती राजेमास्तरांची व्यक्तिरेखा ! तुमच्या आमच्या मनातील आदर्श गुरू त्यांच्या रूपात आपल्याला भेटतो.

**हद्दपार**
**लेखक -** श्री. ना. पेंडसे
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठसंख्या १४९, किंमत ७० रु.

•••

**शैलजा देशमुख**
सी - १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर नं. २, पुणे -९

## ✻ प्रयोग करून तर पहा ✻

### गुप्तलेखाची शाई

दोन चमचे (छोटे) मिठात दोन किंवा तीनच (छोटे) चमचे कढत पाणी घाला. चांगले संकेंद्रित विलयन तयार होईल. बोथटसे टोक केलेल्या एका काडीने हे विलयन शाईसारखे वापरून एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर थोडा मजकूर अथवा एखादा निरोप लिहा. प्रथमत: हा मजकूर तुम्हाला दिसू शकेल. पण अर्धा एक तास कागद तसाच ठेवलात की त्या विलयनाने लिहिलेल्या अक्षरांतून पाणी उडून जाईल, आणि मजकूर दिसेनासा होईल. आता कागदावर गुप्तलेख अदृश्य शाईने लिहिला गेला. आता या कागदावर सॉफ्ट पेन्सिलने अगदी हळू घासा. एकदम सारा मजकूर तुम्हाला काळ्या ठळक अक्षरांच्या स्वरूपात दिसू लागेल. अदृश्य शाईने लिहिलेला मजकूर दिसू लागेल. दृश्य होईल.

**असे का घडते -** अक्षरातील पाणी उडून गेल्यावर मिठाचे बारीक कण कागदाला चिकटून राहतात. ते पांढरे आणि बारीक असल्यामुळे पांढऱ्या कागदाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला दिसत नाहीत. सॉफ्ट पेन्सिलीचे शिसे त्या कागदावर घासल्यावर कण चिकटलेला कागदाचा खडबडीत भाग पेन्सिलीचे शिसे जास्त प्रमाणात खरवडून घेतो. अर्थातच त्यामुळे मिठाच्या कणांच्या स्वरूपात असलेली अक्षरे कागदाच्या इतर भागापेक्षा काळी होऊन अदृश्य लेख दृश्य होतो.



ढग उतरले खाली, निळा निळा दिसे घाट । निळ्या घाटातुन जाई, निळी मखमली वाट ।।



**जरूर पाहा... हेमिस राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९८१, क्षेत्रफळ-४४०० कि.मी. (लेह, जम्मू आणि काश्मीर )
प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

# देव कोपला...

**– मंदाकिनी गोडसे**

अहाहा! किती सुंदर! किती विशाल! विराट!! गर्द वृक्षांनी, तरुवेलींनी वेढलेला तो उत्तर दिशेचा नगाधिप! पर्वतराज! त्याची बर्फाच्छादित उंच शिखरे... आभाळाला भिडणारी! सूर्यप्रकाशात तळपणारी! जणू या आदिपुरुष परमात्म्याची हजारो सहस्रावधी शीर्षेच! ही संपन्न वनसृष्टी, त्यात निर्भयपणे वावरणारे अनेक वन्यजीव, किलबिलणारे पक्षी, वर्षा ऋतूत खळाळत येणारे शुभ्रधवल पाण्याचे प्रवाह, खोल दऱ्यातून संयमाने वाहणाऱ्या नद्या, असंख्य तऱ्हेची फुले... फळे...

हजारो वर्षांच्या संचितातून घडलेला हा रमणीय, नेत्रसुखद, शीतल असा सारा आसमंत, शुद्ध हवेचा प्राणदाता! परमेश्वराच्या अगाध सर्जनशील अस्तित्वाची जाणीव करून देणारा!

फार पूर्वी अगदी प्राचीन कालापासून कुणा योगी साधकांना, महात्म्यांना, विचारवंतांना, ज्ञानवंतांना, हा आसमंत हाकारायचा! खरंतर इथपर्यंत पोचायला लागायची प्रचंड शारीरिक क्षमता, उदंड मनोबल. निश्चयाची, सोशिकतेची, संयमाची अपूर्व तयारी. ती प्राप्त केलेले कुणी ऋषी-मुनी भौतिक सुखांच्या जाळ्यात न गुरफटता, या वृक्षराजीतून बिकट वाटा शोधत या आसमंतांच्या अंतरंगात पोहोचायचे. कुठे एखादी कुटी, झोपडी, आश्रम बांधून ध्यानधारणा करायचे. अत्यंत अल्प गरजा आणि या सृष्टीचे रहस्य शोधण्याची उत्कंठा, विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घेण्याचा ध्यास, ही एक तपश्चर्याच होती... आदीम ज्ञानाची जिज्ञासा ...सर्व ऋतूत सृष्टीची, अनंत आभाळाची, विविध वनस्पतींची, खडक माती, पशू-पक्षी यांची निरीक्षणे करून नोंदलेली ती एक ज्ञानसाधना होती. ही अगाध सृष्टी निर्माणकर्त्याच्या शक्तीचा प्रत्यय येऊन त्यांना अनेक सूक्ते, ऋचा, स्तोत्रे स्फुरायची... ती वाणीतून प्रकट व्हायची! अनेक रूपकं सुचायची...
पंचमहाभूतांच्या, निसर्गचक्राच्या, त्यामागील काही निश्चित नियमांचा हा कर्ता करविता! सहस्रावधी बाहू, पाय, मस्तक यांच्या रूपाने ही सारी अगाध सृष्टी व्यापून उरलेला आहे! हा अवघा परिसरच त्यांना परमेश्वर स्वरूपात दिव्य दर्शन द्यायचा! त्याने भारून गेलेल्या या प्रज्ञावंतांनी, प्रतिभावंतांनी अनेक अभ्यासपूर्ण ऋचा, सूक्ते, काव्ये रचिली. महान ग्रंथांची निर्मिती केली. सरस्वतीचाच तो साक्षात्कार होता!

ही सृष्टी एवढी सुदम्य होती! वर्षा ऋतूत ओथंबून येणारे मेघ या पर्वतशिखरांवर दाटी करायचे! उंच गर्द वृक्ष त्यांच्याशी हितगूज करायचे. कोसळणाऱ्या धारा ते




अलगद झेलायचे. त्यांची घट्ट पाळंमुळं मनसोक्त पाणी प्यायची. खोल माती त्यांना सावरून धरायची पुढे वर्षभर पुरणारा ओलावा हृदयात साठवायची... अवघे डोंगर, कडे-कपारी न्हाऊन, उरलेले पाणी रमतगमत, मुरत दरीतल्या नदीत पोचायचे. सर्व प्राणीजनांच्या पोषणासाठी हे पाणी, नद्या दूरवर नेऊन पोचवायच्या. वर्षानुवर्षे हे निसर्गनिर्मित नंदनवन बहरत होते आसमंत समृद्ध करीत होते.

मग काही माणसे या समृद्धीचा उगम शोधत निघाली.. या अद्भुत सृष्टीला पाहिल्यावर ती अचंबित झाली... अरे ! इथे तर खूपच काही आहे! सौंदर्य, संपत्ती इथे अनेक रूपांनी ओसंडून वहाते आहे.

आणि माणसांच्या डोक्यातली चक्रं फिरू लागली. या परम रमणीय

सृष्टीत, त्यांना स्वत:च्या फायद्याचं खूप काही दिसू लागलं. व्यापारी विचारांची बीजं डोक्यात वळवळू लागली. हा पूर्ण नगाधिपच! खरं तर ज्यांना 'देवात्मा' दिसला त्या ऋषी मुनींच्या ऋचांशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हतं. त्यांनी गणित मांडलं. इथे खूप लोक आले पाहिजेत. इथे परमेश्वराच्या दर्शनाला श्रद्धावान येतील! सृष्टीशोभा पाहायला रसिक येतील! मौजमजेला धनिक येतील! मग माणसांचा व्यापार... श्रद्धांचा व्यापार... भावनांचा व्यापार छान चालेल! इथे 'पापी' पापं फेडायला येतील. लोभी पुण्य जोडायला येतील. दु:खी दु:ख विसरायला येतील. अनेकांच्या अनेक मागण्या घेऊन इथे माणसं येतील. यायला हवीत! मग काय? त्यांची शक्ती पणाला लागली. वाटा, रस्ते निघू लागले. उंच उंच झाडांवर कुऱ्हाडींचे घाव पडले. उभी झाडं आडवी झाली. वर्षानुवर्षे वाढलेल्या त्या देववृक्षांचा हिशोब होत होता फक्त घनफूट लाकडांत! नदीकाठ मोकळे झाले.

झाडांनी, वनचरांनी आकांत केला. ''अरे चाललंय काय? काय ही अरेरावी? का ही दांडगाई? आम्ही ना कुणाच्या अध्यात ना मध्यात! तरी का ही आक्रमणं? का हा सत्यानाश?'' पण ऐकतो कोण? तिथे येत होता फक्त अवजड यंत्रांचे प्रचंड आवाज. डोंगर फोडणाऱ्या यंत्रांचे, झाड कापणाऱ्या मशीन्सचे,




माती उपसणाऱ्या क्रेन्सचे आवाज! मोकळ्या केलेल्या जागांत इमारती उभ्या झाल्या. निवास, न्याहरी, भोजन, अन्नपाणी! 'यात्रा' नामक गोंडस नावाचे गजर दुमदुमू लागले. बिलंदर व्यापाऱ्यांनी गर्दी केली.

ही यात्रा केल्याशिवाय आयुष्याचे सार्थक नाही, पुण्य नाही, मोक्ष नाही. यात्रा ही अगदी कनिष्ठ, प्राथमिक स्तरावरची भक्ती. पण हे लक्षात न घेता लोकांचे जथ्थेच्या जथ्थे त्या पर्वताकडे मार्ग क्रमू लागले. अनेकांना अवघड चढण चढणं शक्य नव्हतं... पण व्यापारी हुशार होते. त्यांनी पर्वतराजीत राहणाऱ्या काटक चलाख आदीम लोकांना हाताशी धरलं, पैशाचं आमिष दाखवलं. डोल्या केल्या, पालख्या केल्या. धनवंत त्यांच्या खांद्यावर बसून वर जाऊ लागले. घोडी आणली. त्यांना लगाम घालून गुलाम केले. कामाला लावले.

परमेश्वराच्या रूपाच्या असंख्य कथा प्रसृत केल्या. देव गुहेत राहतो. देव बर्फात तयार होतो. देव झोपतो, देव प्रगटतो! लोकांच्या भोळ्या भावांना पकडून ठेवणाऱ्या असंख्य कथा... लाखो लोकांच्या रांगा त्या बंदिस्त देवाला पाहायला लोटत होत्या. नागरवस्तीतली, खेड्यापाड्यातली, लहानमोठी लाखो माणसं. **'परमेश्वरा'** ला भेटायला जाऊ लागली. प्रतिवर्षी संख्या वाढतच होती. व्यापाऱ्यांचे 'बाजारही' वाढतच होते. त्यांनी डोंगर आणखी खोदले, पोखरले. हॉटेल्स् बांधली, निवास बांधले. लोकांच्या झुंडी त्यांची गिऱ्हाइके झाली. त्या रमणीय आसमंताची 'बाजारपेठ' झाली. ना कोणाचा प्रतिबंध होता ना कुणाचे नियंत्रण! निसर्गाचे स्वत:चे सारे व्यवस्थापनच माणसांनी मोडीत काढले.

आणि एका वर्षाऋतूत निसर्गचक्रानुसार नभ मेघांनी आक्रमिले ! पाण्याने जडभारीत झालेल्या ढगांची शिखरांवर दाटी झाली. पण त्यांच्या अमृतवर्षावासाठी उल्हासित होऊन, त्यांच्याशी हितगुज करणारी, त्यांना शिरांवर झेलणारी समर्थ वनसृष्टी कुठे होती? त्यांच्या घट्ट पाळामुळांनी धरून ठेवलेली माती मोकळी झाली होती. माथ्यावरच्या मेघांना आधार कोणाचा? मग एकमेकांवर कडकडाट करीत मेघ

फुटू लागले... कोसळू लागले... त्या जलवर्षावात मोकळे डोंगर ढासळू लागले... कडे तुटून खाली येऊ लागले. दरडी ढासळल्या. रस्ते, पूल वाहून गेले... नद्यांना पाणी पेलवेना... त्या फुंफाट करीत सैरावैरा धावू लागल्या... आजवरच्या, जीवनदायिनी अशा त्या सुखसरिता; जीवघेण्या, रौद्र रूपात विक्राळ झाल्या. भक्तांना ब्रह्मांड आठवले... लाखो लोकांना पळायलाही भुई राहिली नाही.



इमारती खेळण्यांसारख्या गडप झाल्या. यात्रेचे पुण्य मिळवण्यासाठी गेलेले असंख्य देहांचे, चिखलमातीत समर्पण झाले. बाप्पांचा आधार शोधायला निघालेले लाखो लोक निराधार झाले. बाजार उजाड झाले!

सहस्त्र रूपांनी रमणीय झालेली; सहस्त्र आविष्कारांनी परमेश्वराचं दर्शन घडवणारी ती 'विराट' सृष्टी 'विराण' करणारी ठरली. परमेश्वराच्या सुंदर निर्मितीचा विध्वंस करणारी माणसं मात्र म्हणत होती... 'देवच कोपला !'

●●●

**– मंदाकिनी गोडसे**
'सदाफुली' मु. पो. देवगड
जि. सिंधुदुर्ग ४१६६१३

# *मेंदूला ताण*

तीन मुले एकापुढे एक अशी उभी आहेत. एका टोपलीत ३ निळ्या व दोन लाल अशा एकूण पाच टोप्या आहेत हे प्रत्येकाला माहीत आहे. त्यांना प्रथम डोळे मिटण्यास सांगितले व प्रत्येकाच्या डोक्यावर एक टोपी घातली. नंतर डोळे मिटण्यास सांगितले व प्रत्येकाच्या डोक्यावर एक टोपी घातली. नंतर डोळे उघडण्यास सांगितले. नंतर त्यांना क्रमाने त्यांच्या स्वत:च्या टोपीचा रंग ओळखण्यास सांगितले. तेव्हा खालील उत्तरे मिळाली.



१) सर्वात मागे असणारा मुलगा क्र.१ म्हणाला, ''मला माहीत नाही''
२) मधला मुलगा क्र. २ म्हणाला, ''मला माहीत नाही''
३) सर्वात पुढील मुलगा क्र.३ म्हणाला, ''मला माहीत आहे. माझ्या टोपीचा रंग..... आहे.''

**प्रश्न : तो रंग कोणता? व त्या मुलाने तो कसा ओळखला?**

**खाली काही कूटप्रश्न दिले आहेत. करा बरं विचार...**

१. पाय नाहीत, पण मी खूप लांब फिरतो.
साक्षर आहे पण मी पंडित नाही.
तोंड नाही पण मी स्पष्ट बोलतो.
मला ओळखील तो पंडित.

२. पर्वतावर रथ चालतो आहे,
पण सारथी आहे पृथ्वीवर
रथाचा वेग हवेलाही मागे टाकतोय,
पण रथ मात्र हलत नाही एक पाऊलभर
तर मी कोण?

(उत्तरे अंकात इतरत्र)



फूल होऊनी वेलीवरचे, झुलायचे मज आहे । आभाळाच्या निळेपणाला, भुलायचे मज आहे ।।
**जरूर पाहा... कान्हा राष्ट्रीय उद्यान,** इ. स. १९५५, क्षेत्रफळ-९४० कि.मी. (मंडला, मध्यप्रदेश ) वाघांसाठी प्रसिद्ध



**प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.**




# जादुई रूपांतरण (भाग २)

**– वाच. नलिनी गुजराथी**

या आधीच्या लेखांक क्र. ३ (सौर ज्येष्ठ)मध्ये रूपांतरणासाठी वापरल्या जाणाऱ्या **magnification, minification, addition** या तीन प्रक्रियांचा आपण विचार केला. या लेखात आणखी तीन प्रक्रियांचा विचार आपण करणार आहोत.

महिन्याभरापूर्वी वृत्तपत्रात एक बातमी वाचण्यात आली. 'कृषी – शास्त्रज्ञांनी काट्यावाचूनचा गुलाब बनविण्यात यश प्राप्त केले आहे.' मी आश्चर्याने थक्कच होऊन गेले! लहानपणापासून ते देखणं गुलाबाचं फूल डोक्यात घालताना, हार करताना काटा टोचायचाच आणि मनात यायचं, काट्याशिवायचा गुलाब असता तर किती बरं झालं असतं! 'काट्यावाचुनि गुलाब नाही' असा दृष्टांत 'कष्टावाचून फळ नाही' हे सांगण्यासाठी दिला जायचा! गुलाबातील काटा वगळण्यासाठी शास्त्रज्ञांना दीर्घकाळ प्रयत्न करावे लागले, तेव्हा कुठे त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन काट्यावाचूनचा गुलाब बनविता आला.

या उदाहरणातून आपल्याला रूपांतरणाची **चौथी** प्रक्रिया कळते, जिचं इंग्रजी नाव आहे **Elimination,** म्हणजे **वगळणे, गाळणे, काढून टाकणे**! वस्तूतील जो घटक अथवा जो गुणधर्म आपणास खटकतो, गैरसोयीचा वाटतो तो काढून टाकण्याने ती वस्तू अधिक उपयुक्त होते, फायद्याची होते. कुठल्याही वस्तूत सुधारणा करताना तिच्यातील दोष, उणिवा जर जाणीवपूर्वक लक्षात घेतल्या आणि त्या काढून टाकल्या तर ती नवनिर्मितीचीच प्रक्रिया होते. आपल्या भोवताली elimination ची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात.

पूर्वी द्राक्षं मिळायची, त्यात बिया असायच्या. आता मात्र थॉमसन सीडलेस द्राक्षं खातांना किती मजा येते. लहान मुलांसाठी बनवलेल्या 'बनीज्'मध्ये, खेळण्यामध्ये कधी त्याचं नाकच गाळलेलं असतं तर कधी कान, कधी पाय तर कधी हात! अशी कार्टून सारखी खेळणी मजेशीर वाटतात. पूर्वी सायकल चालवताना टायरमधील ट्यूब पंक्चर झाली की, पंक्चर काढता काढता वैताग यायचा ! हल्ली मात्र ट्यूबलेस टायर्स मिळू लागले आहेत. कुठल्याही वस्तूच्या नको असणाऱ्या गुणधर्मापाठीमागे 'न' लावला की elimination च्या अनेक कल्पना तुम्हाला पण सुचू शकतील. जसं दूध उतू जातं तर 'न' उतू जाणारं दूध, लसणाला वास येतो तर वास नसलेला (वासरहित) लसूण, अळू खाजतो तर न खाजणारा अळू इ. अशा उदाहरणांमधून भविष्यात वस्तूंमधील कोणते गुणधर्म वगळायला हवेत हे आपल्या ध्यानात येईल.

यानंतरची **पाचवी** प्रक्रिया आहे **Modification** ची म्हणजेच Attribute listing ची. वस्तूतील **गुणधर्मांमध्ये, घटकांमध्ये बदल** करून नवनिर्मिती करण्याची ही बदलाची प्रक्रिया गुंतागुंतीची असू शकते. डॉ. लँगमूर यांनी बल्बमध्ये ज्यावेळी अतिशय बारीक अशी फिलामेंटची तार वापरली, तिला वळसे दिले, बल्बमधील जागा निर्वात ठेवण्याऐवजी निष्क्रिय वायूने भरली तेव्हा पूर्वीच्या कार्बन लँपपेक्षा १५ पट कार्यक्षम असा इलेक्ट्रिक बल्ब तयार झाला. नुसता वस्तूच्या रंगात बदल केला तरी वस्तूला किती नावीन्य, ताजेपणा प्राप्त होतो. स्कूटर्स, कार्स, फ्रिज, मोबाईल यांच्या जर वृत्तपत्रातील जाहिराती तुम्ही बघितल्या तर पूर्वीच्या रंगात बदल करून, आकर्षक रंगसंगती वापरून या वस्तूंची विक्री वाढविण्यासाठी त्याचा कुशलतेने उपयोग कारखानदारांनी करून घेतलेला आढळेल. याचप्रमाणे डोअरबेलच्या पूर्वीच्या कर्कश आवाजात अनेक बदल झाले. डिंग्डाँग बेल, पक्ष्यांचे आवाज काढणारी बेल, आवडत्या सिनेसंगीताच्या ट्यून्स वाजविणारी म्युझिकल बेल इत्यादी. खुर्च्यांच्या



झरे वाहती शुभ्र फेसाळ कैसे । कुणी योजिल्या भव्य येथे शिळा ।।



**जरूर पाहा... काझीरंगा राष्ट्रीय उद्यान**, इ.स. १९०५,क्षेत्रफळ-४७१.७१कि.मी. (गोलाघाट,आसाम)एकशिंगी गेंड्यांसाठी
प्रायोजक – स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे.

आकारात बदल केल्याने डायनिंग चेअर, सोफा, आरामखुर्ची, व्हीलचेअर, रॉकिंग चेअर, रोटेटिंग चेअर असे अनेक प्रकार निर्माण झाले. तेव्हा वस्तूत बदल करीत जाणे ही नवनिर्मितीची फार महत्त्वाची प्रक्रिया आहे, हे आपल्या लक्षात येईल. आता तुम्हीच विचार करा की, सध्या वापरात असलेल्या वस्तूंमध्ये कोणते बदल करायला हवे आहेत?

यानंतरची **सहावी** प्रक्रिया आहे **Substitution** म्हणजे पर्याय शोधणे. येथे तेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रसंगी संपूर्ण वस्तूच बदलली जाते, संपूर्ण प्रक्रियाच बदलली जाते. पूर्वी गॅस पेटविण्यासाठी काडेपेटी वापरत होतो. त्याच्याऐवजी आता अधिक सुरक्षित, कार्यक्षम असा गॅस लायटर वापरला जातो. आपली आजी चटणी करायला दगडी वापरायची, पुरण वाटायला पाटा-वरवंटा वापरायची ! आपली आई याच गोष्टींसाठी मिक्सर, फूड प्रोसेसर वापरते. पूर्वी स्वयंपाक चुलीवर शिजायचा, त्यानंतर पंपाचा केरोसिन स्टोव्ह आला, जो खूप आवाज करायचा. त्यानंतर वातीचा केरोसिन स्टोव्ह आला. आता त्याऐवजी एलपीजी गॅस स्टोव्ह, इलेक्ट्रिक हॉट प्लेट, मायक्रोवेव्ह ओव्हन, सोलर कूकर, बायोगॅस हे विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. कॉटनच्या कपड्यांना टेरिकॉट, टेरिवूल, नायलॉन, पॉलिस्टर हे पर्याय उपलब्ध झाले. बैलगाडीसारख्या वाहनाला सायकल, स्कूटर, मोटर सायकल, कार, बस, ट्रक इ. असंख्य पर्याय उपलब्ध झाले. जीवनाचं असं कुठलं क्षेत्र आहे की, जिथं विविध पर्याय वापरले गेले नाहीत? 'जिकडे पाहावे तिकडे पर्यायच पर्याय सापडतील' असं चित्र आढळेल.

पर्याय शोधण्याची ही प्रक्रिया कधीच संपणार नाही. डायबेटिसच्या पेशंटना साखरेसाठी अनेक शुगर फ्री पर्याय आहेत, तसा मिठाला पर्याय शोधता येईल का? शेतातले नेमके तण उपटून काढणारा रोबो तयार करता येईल का? भविष्यकाळात कशाकशाला पर्याय शोधायचा, याचा विचार लगेचच करायला लागा.

या लेखातील तिन्ही प्रक्रियांचा **Elimination, Modification, Substitution** उपयोग करून तुम्हाला सुचलेल्या कल्पना **'छात्र प्रबोधन'**कडे जरूर पाठवा!

**कृतिपाठ -४**

१. या लेखात दिलेल्या तीनही प्रक्रिया वापरून भविष्यातील नवीन ५ वस्तूंची उदाहरणे सांगा.
२. भारतीय पद्धतीच्या स्वयंपाकाची भांडी धुण्याच्या मशीनमध्ये कोणकोणत्या सुधारणा करता येतील?

●●●

**- वाचस्पती नलिनी गुजराथी**
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्र. ५,
पुणे ४११००२

**ज्ञान प्रबोधिनी**
**प्रज्ञा मानस संशोधिकेद्वारा**
**सर्वांगीण बालविकास शिबिर** (अनिवासी)
**(वयोगट ७ ते १२ वर्ष)**
**दिनांक :** ११ ते १७ नोव्हेंबर २०१३
**स्थळ :** ज्ञान प्रबोधिनी **वेळ :** स. १२ ते ५
**शुल्क : ₹ १५००/-**
**नोंदणी :** १५ सप्टेंबरपासून सुरू.
*** संपर्क ***
**सुजाता होनप** - ९४२०१७८०२०
**वीणा तिखे** - ८३९०९९८२६३

## * अभिनंदन *

मागील अंकातील **'सोडवा हे मोरपिशी कोडे'** या सदरामध्ये केलेल्या आवाहनास प्रतिसाद देऊन **मा. वि. प. उत्कर्ष आश्रमशाळा वाघेरा, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक** या शाळेतील ४० विद्यार्थ्यांच्या गटाने व चि. श्रेयस कापाळे (पुणे), कु. गायत्री जोशी (ठाणे), कु. स्नेहा मंडलिक (मिरज) या विद्यार्थ्यांनी १० पैकी ३ किंवा त्यापेक्षा अधिक कवितांचे कवी ओळखून त्या पूर्ण कविता आमच्याकडे पाठविल्या आहेत. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !




तरुवल्लरीचे इथे मुक्त गाणे । फुले डोंगराचा पिसारा निळा ॥

**जरूर पाहा... कांचनजुंगा राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९७७, क्षेत्रफळ-१७८४ कि.मी. (चुंगथांग, सिक्कीम)



प्रायोजक - श्री. अजित विद्याधर परांजपे, अमेरिका.



# कावळे गुरुजी

– इंद्रजित भालेराव

*आपण वयाने कितीही मोठे झालो तरीही लहानपणीची आपली शाळा, मित्र, शिक्षक यांविषयी आपल्या मनात नाजूक आठवणींचा गोफ असतो. ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाच्या निमित्ताने आपल्या गुरुजींबद्दलच्या हळूवार आठवणी सांगाताहेत संवेदनशील लेखक-कवी इंद्रजीत भालेराव. वाचूया हा काव्यात्म ललित लेख.*

चाळीस वर्षांनंतर लावला शोध
आता गुरुजी झालेल्या माझ्याच एका विद्यार्थ्याने
की, आता कावळे गुरुजींचं घरटं कुठल्या झाडावर आहे ते.
मी धावत गेलो त्यांना भेटायला तर,
काळाने त्यांच्या चेहऱ्यावरची चमक उडवली होती;
पण डोळ्यातला उबदारपणा त्याला उडवता आला नाही.
मी पाहिले गुरुजींच्या डोळ्यांत डोकावून
आणि सर्ररकन सरकला काळ चाळीस वर्षं मागे...



शाळा सुटली की गुरुजींच्या खोलीवर भरायची शाळा!
गुरुजींसोबत नदीकाठी फिरायला जाणं,
पोरांनाही लाजवणाऱ्या गुरुजींच्या खोड्या!!
शाळेभोवतीची वडारांची, बनभिकाऱ्यांची पालं,
वर्ग सुरू असताना व्हरांड्यात लोळणारी
वडारांची पोरं आणि त्यांच्या आया,
कुंभाराची गाढवं आणि त्यांची शिंगरं,
वर्गाबाहेरून येणारे शेतातले हाकारे- हुकारे,
यातुनही गुरुजी लक्ष्य वेधून घ्यायचे शिकवण्याकडे...

माझ्या लांड्या चड्डीचा केला उल्लेख
गुरुजींनी मांडीला हात लावून दाखवत,
डोक्यावरची टोपी आणि कपाळावरलं गंधही त्यांना आठवलं...
माझ्या डोळ्यांत त्यांनी 'तेव्हा' पाहिलेली उमेद
मी खरी करून दाखवल्याचा आनंद
त्यांच्या चेहऱ्यावर 'आज' ओसंडून वहात होता...



केवढी मोठी आहे बाई आभाळाची पाटी । चंद्र आणि चांदण्यांची तरी होते दाटी ।।



**जरूर पाहा... कुद्रेमुख राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९८७, क्षेत्रफळ-६००.३२ कि.मी. (चिकमंगलूर, कर्नाटक)

**प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.**

गुरूमायला म्हटलं, ‘‘आम्ही शहरात आलो होतो प्रथमच
परीक्षा द्यायला, तेव्हा तुम्ही जेऊ घातलं होतं आम्हाला प्रेमानं;’’
तर त्यांना त्यातलं काहीच आठवत नव्हतं.
सगळं लख्ख आठवणाऱ्या गुरुजींनाही जसं आठवत नव्हतं;
आयुष्यात आम्ही प्रथमच पाहिलेल्या आणि परीक्षा संपल्यावर
शेवटच्या दिवशी गुरुजींनीच दाखवलेल्या शिणेमाचं नाव...
एकदिवशी गुरुजींना वर्गात यायला उशिर झाला म्हणून
एका मुलीनं दुसरीला विचारलं, ‘‘कावळे गुरुजी कुठं गेले?’’
दुसरीनं वर्गाबाहेरच्या झाडाकडं बोट दाखवलं...
नेमका त्याचवेळाला गुरुजींनी वर्गात प्रवेश केला
आणि बसून राहिले खुर्चीवर मौनात
मुलींनी काहीही विचारलं गुरुजींना, की ते
वर्गाबाहेरच्या झाडाकडं बोट दाखवायचे
मुलींना अनावर झाला हुंदका, तेव्हा सोडले गुरुजींनी मौन
आणि तेव्हा जे बोलली त्यांची वाणी;
त्या सगळ्या अमृताच्या खाणी मुलांनी आयुष्यभर जपल्या
गुरुजींनी धारण केलं होतं ज्या पाखराचं नाव
त्याचा गाव सर्वांनाच वाटला देवाची आळंदी...

जातीवर मात करत गुरुजींनी शिकवले धडे
आणि पाढेही पाठ करून घेतले समतेचे;
ममतेचे हात सर्वांच्या पाठीवर फिरवत
गिरवायला लावली त्यांनी अवघड बाराखडी
आणि करून दाखवली विद्यार्थ्यांची फौज खडी



अगदी मौज करत करत केले हे सगळे गुरुजींनी...
गुरुजी सांगत होते अभिमानानं,
की त्यांचा गुरुजी झालेला मुलगाही
कसा जीव लावतो विद्यार्थ्यांना
कशी धावत येतात मुलं त्याच्या पाठीमागं
शाळा सुटल्यावरही...

राजहंसाच्या स्वभावाचे, पण आडनाव ‘कावळे’ असलेले
एक गुरुजी आम्हाला शिकवायला होते.
त्यांच्या चोचींनी आम्हाला त्यांनी उचललं अलगद
आणि आणून बसवलं या आयुष्याच्या मानस सरोवरात
नाहीतर आम्ही
वाहत राहिलो असतो ओढ्या-ओघळींनी...

•••

**- इंद्रजित भालेराव**
एकनाथनगर, परभणी ४३१ ४०१

**✼ विज्ञानाच्या चष्म्यातून ✼**

**माठात पाणी गार होतं, याचं कारण तुम्हाला माहिती आहेच. त्या आधारावर खालील प्रयोग करून पाहा.**

**माठातील पाणी गार होणे कशाकशावर अवलंबून आहे?**

१. माठाच्या बाहेरून ओले फडके ठेवले तर? फडक्याची जाडी, कापडाचा प्रकार बदलला तर काय परिणाम होईल?
२. माठ उन्हात ठेवला अन् सावलीत ठेवला तर कशातले पाणी लवकर गार होईल?
३. नवीन माठ अन् जुना माठ याचा पाणी गार होण्याशी काय संबंध?
४. माठाच्या आकाराचा पाणी गार होण्याशी काही संबंध आहे का?

प्रयोग शास्त्रशुद्ध करायचा बरं का. त्यासाठी तुमची निरीक्षणे अचूक असायला हवीत.
माठाव्यतिरिक्त पाणी गार करण्याच्या अन्य काही पद्धती, युक्त्या तुम्हाला माहीत आहेत का?
तुमच्या प्रयोगांचे निष्कर्ष अन् त्यामागचे शास्त्रीय कारण आमच्यापर्यंत पोहोचवा.



गुलमोहोराच्या फांदीवर, बसली होती खार । ऊन होते दुपारचे, पण सावली होती गार ।।

**जरूर पाहा : महात्मा गांधी जलचर प्राणी उद्यान**, इ.स.१९८३, क्षेत्रफळ-२८१.५० कि.मी. (अंदमान-निकोबार) जलचरांसाठी प्रसिद्ध



**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.**




मला वाटते व्हावे झाड, अशा ठिकाणी उगवावे की। जेथे आहे माळ उजाड ।।



**जरूर पाहा... मदुमलाई राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९४०, क्षेत्रफळ-३२१.५५ कि.मी. (उटी, तामिळनाडू)

**पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन -** प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ ०२०-२४२०७१४५

## गटात निर्णय घेताना...२

लेखांक – ८

– महेन्द्र सेठिया




मागच्या अंकात गटात निर्णय घेताना कोणत्या पायऱ्या वापराव्यात, निर्णयासाठी गटचर्चा कशी करावी हे आपण पाहिले. त्याप्रमाणे गटातले निर्णय जाणीवपूर्वक घ्यायचा प्रयत्न केला का?

रीत कळली. तंत्र समजले तरी ते लगेच अंगवळणी पडत नाहीत. त्या तंत्रांचा, पद्धतींचा सराव करावा लागतो. असा सराव करताना काही चूका होणार, काही निर्णय चुकणार. त्याने बिचकून जायचं नाही; हे शिकावं लागतं. चुकांचे विश्लेषण करून अधिक चांगला निर्णय कसा घेता आला असता याचीही चर्चा गटात व्हायला हवी. 'कोण चुकलं' यापेक्षा 'नेमकं काय चुकलं', पुढच्यावेळी कुठे अधिक विचार करायला हवा, अधिक काळजी घ्यायला हवी? याची चर्चा व्हायला हवी, म्हणजे हळूहळू गट म्हणूनही अधिक चांगले निर्णय घेता येतील.


पण या प्रक्रियेचा सराव करता करता तुमच्या लक्षात येईल, की **गटात निर्णय घेण्यामध्ये मोठा अडथळा असतो तो गटातल्या सदस्यांच्या स्वभावाचा!** स्वभावातील काही दोष हानिकारक ठरतात. असे कोणते दोष आहेत हे पुढे आपण समजून घेणार आहोत. त्यातले कोणते दोष आपल्या स्वत:मध्ये वा गटातील सदस्यांमध्ये कमी–अधिक प्रमाणात आहेत हे जाणून घ्यायचा प्रयत्न करा. यासाठी परस्परांची मदत घ्या. प्रामाणिकपणे आपला स्वभाव ओळखण्याचा प्रयत्न करा. आपल्या स्वभावातले दोष समजले, ते स्वीकारले तर ते दूर करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करता येईल. पण दोष लक्षात येऊनही स्वीकारायची तयारी नसेल वा दोष आहेत हेच लक्षात येत नसेल तर मात्र ते कमी करणं खूप अवघड असतं. निर्णय घेण्याचे (एकट्याने वा गटांमध्ये) वेगवेगळे प्रसंग तुम्ही आठवून पाहा. खालीलपैकी काय–काय घडतं?

• **निर्णय घेण्याची भीती –** गटामध्ये आपण छान गप्पा मारतो–मिसळतो; पण एखादी गोष्ट ठरवायची म्हटली, निर्णय घ्यायचा म्हटला की, आपण गप्प तरी होतो किंवा तिथून काढता पाय तरी घेतो. 'निर्णय चुकला तर?... निर्णयाच्या वेळी मतमतांतरे, भांडणे झाली तर...निर्णय घेताना मी केलेल्या सूचनेला सर्वजण हसले तर?... माझं कोणी ऐकूनच घेतलं नाही तर... ' न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव अशा काही कारणांमुळे निर्णय घेण्याचे प्रसंग आपण टाळायला लागतो. आपली भीती अधिक पक्की होत जाते. असं होतं का तुमच्या बाबतीत? तर मग त्यावरचा उपाय म्हणजे अशा प्रसंगांना ठरवून सामोरं जाणं. छोटया–सोप्या निर्णयांपासून प्रारंभ करणं. स्वत:शी 'मी भीतीवर मात करणार, मला जमेल, का नाही जमणार?' अशा विधायक विचारांनी स्वत:शीच संवाद करण्याचा प्रयत्न करा. गरजेनुसार मोठ्यांची मदत जरूर घ्या. पण त्यावर मात करण्यासाठी तुमचे तुम्हालाच प्रयत्न करावे लागतील.

• **पर्याय निवडताना मनात चालू असलेला वाद –** गटचर्चेतून आपल्यासमोर अनेक पर्याय आलेले असतात. मग या पर्यायांपैकी नेमका कोणता पर्याय निवडावा 'हा की तो' याबाबत सतत गोंधळ, वाद आपल्यापैकी काहींच्या मनात चालू असतो. 'योग्य' पर्याय निवडताच येत नाही. आपले पर्याय निवडीचे निकष अधिक पक्के आणि स्पष्ट असतील तर हा गोंधळ कमी होईल. तेव्हा निकषांबाबत स्पष्टता, प्राधान्यक्रम नीट ठरवता येणे यासाठी प्रयत्न करा. निवडलेल्या पर्यायांचे नेमके काय काय परिणाम होतील याचा विचार करा. सर्वंकष विचार, तपशिलात जाऊन करायचा विचार, संभाव्य परिणाम, अडथळ्यांचा विचार याचा सराव यासाठी उपयोगी पडेल. 'डोक्याला ताप नको' असा स्वभाव असेल तर योग्य पर्याय निवडण्याबाबत अडचणी निर्माण होतील. निर्णय घेताना बुद्धीचा पूरेपूर वापर करायला हवा यासाठी बुद्धीचे वेगवेगळे पैलू वापरून विचारकौशल्ये विकसित करण्यावर भर द्यायला हवा. याबरोबरच प्रत्येक पर्यायामध्ये काही उणिवा राहणारच;



तेज बघावे नक्षत्रांचे, रंग बदलत्या ऋतुचक्राचे । झटका आळस, टाका पाऊल उत्साहाने पुढे ।।
**जरूर पाहा... नमदाफा राष्ट्रीय उद्यान**, इ.स. १९७४, क्षेत्रफळ-१९८५.२४ कि.मी. (अरुणाचल प्रदेश)
प्रायोजक – मे. सी. व्ही. कांड कन्सलटन्टस् प्रा. लि., पुणे.



त्यामुळे कोणताच पर्याय शंभर टक्के अचूक नसतो, हेही लक्षात ठेवूया.

• **निर्णय अमलात आणतांना होणारी धरसोड–** एकदा गटाने मिळून निर्णय पक्का केला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी काही तरी वेगळं सुचतं. आधी सुचलेले अन्य काही पर्याय निवडण्याचा मोह होतो. इतरांची बोलणी, प्रतिक्रिया यांचा सतत आपल्या विचार–कृतीवर प्रभाव पडतो आणि त्यामुळे निर्णय प्रत्यक्षात आणताना, 'हे नको ते नको', 'नको हेच बरं', 'असं नको तसं करू', 'ह्याला नको त्याला करायला सांगू' असे सतत छोटे मोठे बदल करावेसे वाटतात. बरं ते पण पक्के नसतात. त्यात सतत 'धरसोड' करण्याची वृत्ती असते. त्याने अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. अधिकच नैराश्य येतं. म्हणूनच **निर्णयातला ठामपणा** खूप आवश्यक असतो. ठामपणा जाणीवपूर्वक मिळवायला अन वाढवायला हवा बरं का! हेकेखोरपणा, हट्टीपणा, दुराग्रह मात्र असता कामा नये.

• **उतावळेपणा–** निर्णय घेताना वा निर्णयाची कार्यवाही करताना आपल्याला काही वेळा खूप घाई झालेली असते. काहींना तर कायमच अशी घाई असते, हो ना ! शांतपणा, संयम, धीर धरणं हे स्वभावगुण जाणीवपूर्वक मिळवावे लागतात. गटात निर्णय घेताना अनेकांच्या मतमतांतरामुळे निर्णय प्रक्रिया लांबू शकते; पण त्यासाठी थांबायची आपली तयारी नसते. मग अस्वस्थता निर्माण होते, इतरांना कमी लेखायला सुरुवात होते. तीच गोष्ट अंमलबजावणीच्या वेळी दिसून येते. सर्वजण एकसारख्या क्षमतेचे असणार नाहीत त्यामुळे कामाची गती काही वेळा कमी होऊ शकते. ते स्वीकारायची तयारी हवी. अन्यथा उतावळेपणातून गोंधळ, चुका, परस्परांमधला रोष वाढण्याचीच शक्यता अधिक.

• **अकारण दिरंगाई –** उतावळेपणाच्या बरोबर विरुद्ध स्वभाव काहींचा असतो. अगदी गळ्याशी जोपर्यंत येत नाही तोपर्यंत निर्णय वा कार्यवाही पुढे पुढे ढकलत राहायचं. अशामुळे गटातील अन्य सदस्यांचे सहकार्य कमी होत जाते, नाराजी वाढते, हेतूबद्दल शंका घेतली जाते, विश्वास कमी होतो. परिस्थितीच्या रेट्यामुळे निर्णय आपण ठरविण्याऐवजी परिस्थितीच ठरविते आणि अपेक्षित परिणाम साधता येत नाही. आधी निर्णय घेऊन ठेवला आणि कार्यवाहीबाबत जर दिरंगाई केली तर प्रत्यक्ष निर्णयाच्या अंमलबजावणीच्या वेळी वेगळीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. अशावेळी आधी घेऊन ठेवलेला निर्णय त्या परिस्थितीत चुकीचा ठरू शकतो. नको तितकी स्वस्थता, संथपणा, दिरंगाई हे निष्क्रियतेचे, अकार्यक्षमतेचे लक्षण आहे. त्यावर ठरवून मात करावी लागते.

• **घेतलेल्या निर्णयाशी बांधिलकीचा अभाव –** गटाने मिळून निर्णय अंतिम केला की मग 'माझे मत काय होते', हे विसरून घेतलेला निर्णय यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असते. पण काहींचा स्वभाव तटस्थतेचा असतो. घेतलेल्या निर्णयाबाबतची साशंकता, निर्णयाची कार्यवाही यशस्वीपणे झाली तर आपल्याला त्या यशाचे श्रेय किती मिळणार? निर्णय चुकला तर त्याचे खापर आपल्यावर फुटणार नाही ना? माझ्या आवडीचं काम मला करायला मिळेल ना? माझ्या आवडीच्या मित्रांबरोबरच मला काम करायला मिळेल ना? या व अशांसारख्या शंकांमुळे, आग्रहांमुळे, परस्परांच्या विश्वासाच्या अभावामुळे निर्णयाशी व निर्णयाच्या अंमलबजावणीशी आपली बांधिलकी कमी व्हायला लागते. मग निर्णय उत्तम असूनही कार्यवाही मात्र तशी होत नाही. गटात एकदा निर्णय झाला की सर्वशक्तीनिशी झोकून देऊन त्या निर्णयाशी बांधिलकी मानण्याचा स्वभाव म्हणूनच जाणीवपूर्वक विकसित करायला हवा.

हे सगळं वाचताना फार बिचकून जाऊ नका, घाबरूनही




मेघ तर स्वत:हून पाऊस होऊन येतो ना! पाणी देखील स्वत:हून वाफ होऊन जाते ना!



**जरूर पाहा... नंदादेवी राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९८२, क्षेत्रफळ-६३०.३३ कि.मी. (चमोली, उत्तराखंड)
**प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.**

जाऊ नका. हा लेख तुमचे आई-वडील, मोठी भावंडे, शिक्षक यांपैकी कोणाबरोबर तरी वाचून त्याचा अर्थ उदाहरणांसह समजावून घ्या. तुमचा स्वभाव त्यासंदर्भात तपासून पाहा. तुमच्यात हे दोष कमी अधिक प्रमाणात असले तरी गोंधळून जाऊ नका. निर्णय घेता येणं हे एक कौशल्य आहे आणि सरावानं ते वाढविता येतं हे पक्कं लक्षात ठेवा. म्हणूनच यापुढे अधिकाधिक प्रसंगांमध्ये एकट्याने व गटानेही छोटे-मोठे निर्णय घेण्याचा प्रयत्न करा. योग्य



निर्णय प्रक्रियेचा वापर करत जरी निर्णय घेतला तरी चुका होऊ शकतील; पण त्या चुकांमुळे घाबरून न जाता पुढच्यावेळी अधिक विचारपूर्वक, स्वभावदोष कमी करत निर्णय घेण्याचा अभ्यास चालू ठेवा. मला खात्री आहे, की यामुळे तुमचा निर्णय घेण्याचा आत्मविश्वास आणि निर्णय यशस्वी होण्याची शक्यता नक्कीच वाढेल!

•••

**- प्रा. महेन्द्र सेठिया**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

---

पान ५ वरील कोड्याचे उत्तर - १ व ४. गजवदन २. गजर ३ व ५. रदन

---

**पान क्र. १३ वरील कोड्याचे उत्तर -** क्र. १ च्या मुलाला पुढच्या दोघांच्या टोप्या दिसत असूनही स्वत:च्या टोपीचा रंग सांगता येत नाही. याचा अर्थ - पुढील दोघांच्याही डोक्यावर लाल रंगाच्या टोप्या नक्की नाहीत. मग पुढील शक्यता उरतात.

| शक्यता | दुसरा | तिसरा |
|---|---|---|
| १ | निळा | निळा |
| २ | लाल | निळा |
| ३ | निळा | लाल |


क्र.२ चा मुलगा केव्हा हो म्हणाला असता?
त्याने विचार केला जर मागचा मुलगा नाही म्हणतोय याचा अर्थ आपण व आपल्या पुढचा मुलगा दोघांच्याही डोक्यावर लाल टोप्या नाहीत. जर पुढच्याच्या डोक्यावर लाल टोपी असती तर माझ्या डोक्यावर नक्की निळी टोपी असती. परंतु तो नाही म्हणाला-याचा अर्थ आता खालील दोन शक्यताच उरल्या.

| शक्यता | दुसरा | तिसरा |
|---|---|---|
| १ | निळा | निळा |
| २ | लाल | निळा |

मुलगा क्र.३ - ज्याअर्थी मागचा मुलगा ''माहीत नाही'' म्हणतो याचा अर्थ माझ्या डोक्यावर निळीच टोपी आहे.

कूटप्रश्नांची उत्तरे - १. पत्र २. कुंभाराचे चाक

---




लेफ्टनंट कर्नल कार्लेकर रेल्वे स्टेशनवर उतरले. त्यांनी पाठविलेला संदेश मिळाला नसल्याने जीप घ्यायला आलेली नव्हती. त्यांनी छावणीत फोन केला, ''मै मुंबईसे कार्लेकर आया हूँ। जीप भेज दो।'' सैन्यात प्रत्युत्तर करायचा रिवाज नसल्याने उपस्थित जवानाने 'जी साब' असे म्हणून फोन ठेवला. एक तास उलटून गेला तरी जीपचा पत्ता नसल्याने ले. कर्नल कार्लेकरांनी पुन्हा फोन केला व ते संतापाने म्हणाले,'जीप अभी तक क्यों नहीं भेज दी गयी?' तो जवान कसाबसा उत्तरला, 'साब अगर आप 'कार लेकर' आए हैं तो भी आपको जीप क्यों चाहिए? यहीं मै एक घंटेसे सोच रहा हूँ।'

---

एका शहारातील माणूस खेडेगावात राहण्यासाठी आला. तो गावातील सरपंचास म्हणाला,''प्रामाणिकपणे जीवन जगावं म्हणून मी शहर सोडून मुद्दाम येथे स्थायिक होण्याचे ठरवले आहे.''
''फारच छान! आपल्याला दुसरा कोणीही स्पर्धक येथे असणार नाही.'' सरपंचांनी आपला अभिप्राय व्यक्त केला.



या निळ्या आभाळाची, आहे किती नवलाई । चमचम चांदण्यांची, सर हिऱ्यालाही नाही ।।

**जरूर पाहा : व्हॅली ऑफ फ्लॉवर्स राष्ट्रीय उद्यान,** इ.स.१९८२, क्षेत्रफळ-८७.५० कि.मी. (उत्तराखंड) फुले व कीटकांसाठी



**प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.**

# ‘टीम निवांत’ची अंधत्वावर मात !

**– मीरा बडवे**

*स्वप्नं बघण्याचा अधिकार सर्वांनाच असतो. मग ती व्यक्ती डोळस असू दे वा अंध ! आपल्या अंध मित्र मैत्रिणींची स्वप्नं ‘आपली’ मानून ती पूर्ण होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणारी, त्यांच्यापाठीशी खंबीरपणे उभी असलेली, ती स्वप्नं पूर्ण होण्यासाठी झटणारी संस्था म्हणजेच ‘निवांत अंध मुक्त विकासालय’. अंध मित्र-मैत्रिणींना उच्च शिक्षणाच्या संधी व साधने उपलब्ध करून देण्यासाठी झटणाऱ्या, अंध बांधवांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना समाजात सन्मानाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या ‘निवांत’च्या संस्थापिका मीराताई बडवे यांच्या शब्दांत जाणून घेऊया या संस्थेविषयी...*


पुस्तके दाखवताना मीराताई ...

संगणकाच्या विविध भाषा लीलया वापरून संगणकावर प्रोग्रॅमिंग चालू आहे. पलीकडे बसलेला मुलगा फेसबुकवर फोटो लोड करतो आहे व events ची माहिती टाइप करतोय. हॉलमध्ये शामक दावरचे कोरिओग्राफर्स पाश्चात्य नृत्याचे धडे देत आहेत. कोणी कथ्थकचं शिक्षण घेतंय. खिडकीत दोन विद्यार्थी पेपर फोल्डिंग करून पेपर बॅग्ज बनवताहेत. वरच्या खोलीत आंतरराष्ट्रीय दर्जाची उत्तम चॉकलेटस् बनवण्याचा जोरदार उद्योग चाललाय. प्रिंटरही चालू आहे. खूप पुस्तकांचं प्रिंटिंग सतत चालू आहे. पलीकडच्या छोट्याशा जागेत या पुस्तकांचं बाइंडिंग चाललंय. लॉनवर प्रसन्न हसत एक चिमणी गुलाबाची सुंदर फुलं बनवते आहे. समोर लायब्ररीत कोणीतरी आरामात पुस्तक वाचत बसलंय. थोडं पुढे सरकलं की तुम्ही बागेत याल. इथे तर एक गडी पक्ष्यांशी गप्पा मारतोय. अभ्यासाचे वेगवेगळे वर्ग चालले आहेत. कोणी मानसशास्त्र शिकतंय तर कोणी अर्थशास्त्र, कोणी कॉमर्स तर कोणी ‘लॉ’! कोणीतरी एम.सी.एम. करतंय तर कोणी लायब्ररी सायन्सच्या एन्ट्रीज शिकतंय. किचनमध्ये कोणीतरी मस्तपैकी आलं कुटून आल्याचा चहा बनवतंय. इतक्यात पोस्टाची व बँकेची कामं, चॉकलेट डिलिव्हरी उरकून एक उस्ताद आत शिरतोय.

आता मनात प्रश्न उमटलाच असेल – ‘यात जगावेगळं काय घडलं?’ अनेक संस्थांमध्ये हे सगळं घडतंच. आता जे वाक्य आपण वाचणार आहोत त्यानी आश्चर्याचा धक्का नक्कीच बसणार आहे. ही सर्व कामं अंध विद्यार्थी करताहेत व स्वत:चं पी. एच.डी. पर्यंतच शिक्षणही स्वाभिमानाने वरील सर्व कामं करून पूर्ण करताहेत! आहे ना हे सारं जगावेगळं, थक्क करणारं, अविश्वसनीय! कसं निर्माण झालं हे इतकं ‘सकारात्मक जग?’ या साऱ्या प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी ‘निवांत अंध मुक्त विकासालया’ची कथा समजून घेणं फार गरजेचं आहे.

वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर समाजकल्याणच्या कायद्यानुसार अपंग मुलांना स्वतंत्रपणे जगण्यासाठी सोडून दिलं जातं. १८ वर्षांपर्यंत जर ही मुलं नशीबवान असतील तर, त्यांचे आईवडील वा नातेवाईक त्यांना शाळेत आणून सोडतात. अंध जगतालाही हाच कायदा लागू होतो. दारिद्र्य, अंधश्रद्धा, मुलगी म्हणून उपेक्षा या समस्यांमुळे अनेकदा जन्मत:च या मुलांना सोडून दिलं जातं. एकदा शाळेत सोडल्यावर आई-वडील पुढल्या आयुष्यात या मुलांना भेटतात असंही नाही. काही अनाथ असतात तर काही सनाथ असूनही अनाथच असतात.

१८ वर्षापर्यंत अनेक अंधशाळा अंध विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देतात; परंतु अंध मुलांना बरेचदा शाळेत दाखल केलं जातं. त्यामुळे १८ वर्ष वयापर्यंत त्यांचं क्रमिक शिक्षण अपुरं असतं आणि व्यावसायिक



कधी पांढऱ्या आभाळावर, रंगपेटीही सांडून जाते । चित्रकलेच्या जणू वहीवर, चित्र मजेचे तयार होते ।।



**जरूर पाहा... पेंच राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९७७, क्षेत्रफळ-७५८ कि.मी. (सिवनी, मध्यप्रदेश)

**पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** - प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

प्रशिक्षण जीवन जगण्याइतके पैसे मिळवून देईल इतकं सखोल नसतं. आता मात्र 'अंधार मनात अन् अंधार बाहेर' अशीच स्थिती येते. परत जायला घर नसतं कारण कुटुंबाला ही मुलं अनुत्पादक व भार वाटत असतात. समाजाला या मुलांना शिक्षण व कौशल्य देऊन उत्पादक जीवन देता येईल याची जाण नसते. काय करणार ही मुलं? अशी ही मुलं दिशाहीन होतात. उच्च शिक्षण घेण्याची ऊर्मी मनात असते पण वाटच दिसत नाही. समाज या मुलांना व मुलींना वाममार्गाला लावू शकतो.

१९९६ पूर्वी 'नॅब' ही संस्था दहावीपर्यंतची पुस्तकं ब्रेलमध्ये उपलब्ध करून देऊ शकायची. अभ्यासक्रम डोळसांचा होता; परंतु शैक्षणिक सुविधा मात्र शून्य होत्या. दहावीनंतरच्या विद्यार्थ्यांसाठी एकही अक्षर ब्रेलमध्ये उपलब्ध नव्हतं. ही मुलं बुद्धीनं कमी नव्हती. त्यांच्या मनात उच्च शिक्षण घेण्याची प्रचंड ऊर्मी होती. फक्त दिशाहीन आणि संभ्रमात असलेल्या या मंडळींच्या आयुष्याला शिक्षण देऊन पोत सुधारण्यासाठी 'निवांत'ची पुण्यामध्ये स्थापना झाली. आज 'निवांत' उच्च शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचं घर बनलं आहे.

गेल्या पंधरा वर्षांच्या कालावधीत 'निवांत'ने सामाजिक चित्र बदलण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या अंध विद्यार्थ्यांना अनुत्पादक घटक म्हणून सोडून देण्यात आलेलं होतं ते सर्व वेगवेगळ्या करियर वाटा पार करून समाजाचा अत्यंत उत्पादक घटक झालेली आहेत. त्यांना आता अनाथ वाटत नाही. 'निवांत' हे त्यांचं कुटुंब आहे. त्यांच्याच ऊर्जेचा स्रोत वापरून सुरुवातीला ब्रेल पुस्तकांची निर्मिती करण्यात आली. 'रोटरी क्लब ऑफ पुणे वेस्ट-एण्ड'नं दिलेल्या ब्रेल प्रिंटर्समुळे 'निवांत'नी ३,००० ब्रेल पुस्तकांचे 'व्हिजन अनलिमिटेड' हे ग्रंथालय उभे केले आहे. या ग्रंथालयाच्या आता महाराष्ट्रात सतराहून अधिक शाखा आहेत. सुधा मूर्ती, विं. दा. करंदीकर, नारायण सुर्वे, मीना प्रभू, गो. नी. दांडेकर, शांता शेळके इत्यादी अनेक महान कवी व लेखकांची शेकडो पुस्तकं इथे


संगणकावर प्रशिक्षण...

छापली जातात व ब्रेल पुस्तकांच्या प्रकाशनाच्या वेळी स्वत: लेखक-कवी विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. या ग्रंथालयातील सर्व ब्रेल पुस्तकांचं प्रिंटिंग, बाइंडिंग, पोस्टाने वाचकांना पुस्तकं पाठवणं; हे सारं काम इथले विद्यार्थीच करतात. सर्व शाखा व विषयांची क्रमिक पुस्तकं व नोटस्ही इथे पुरवल्या जातात.

'निवांत'मध्ये अनेक विषयांचा क्रमिक अभ्यास करून घेतला जातो. विद्यार्थी कॉलेजला जातात; परंतु अनेक संकल्पना त्यांच्यापर्यंत पोचवण्यासाठी वेगळीच शैक्षणिक साधनं आवश्यक असतात. 'निवांत'मध्ये त्यांच्यासाठी साधी, स्वस्त व सहजासहजी तयार होणारी शैक्षणिक साधनं उपलब्ध करून देण्यात आली. मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून त्यांना त्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार मार्गदर्शन करण्यात येतं. कॉम्प्युटर सायन्स, कॉमर्स, कलाशाखेतले सर्व विषय, लॉ, लायब्ररी सायन्स, बेकरी कन्फेक्शनरी, एम. एस. डब्ल्यू, डान्सिंग, डी.एड., बी.एड, इत्यादी विविध क्षेत्रातलं प्रशिक्षण त्यांना घेता येतं. हे विद्यार्थी परकीय भाषांवरही प्रभुत्व मिळवत आहेत. जर्मन, जॅपनीज, फ्रेंच भाषा शिकून ते आता विविध कंपन्यांचे टेक्निकल ट्रान्सलेटर्स म्हणून काम करत आहेत. ११ वी ते पी. एच. डी. व संगणक क्षेत्रात एम. सी. एम पर्यंत त्यांनी मजल मारली आहे.

विविध कला, व्यवसाय यांचे शिक्षण आत्मसात करत असताना हे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत का? गेल्या पंधरा वर्षातला निकाल १००% आहे. कित्येक विद्यार्थी आपापल्या शाखांत प्रथम आले आहेत.



कधी कधी अचानक, अंधार होतो दाट । अंधारातच दिसू लागते, चांदण्याची वाट ।।

**जरूर पाहा... पेरियार राष्ट्रीय उद्यान**, इ.स.१९८२, क्षेत्रफळ-३०५ कि.मी.(पेरियार, केरळ) जंगली हत्तींसाठी प्रसिद्ध



**राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला** - जनतंत्र उद्‌बोधन मंच, संत्रिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१८७

अभ्यासाबरोबरच अत्यंत स्वाभिमानाने व आत्म-सन्मानाने हे विद्यार्थी पैसे कमावतात. विविध मालाच्या विक्रीतून आलेलं उत्पन्न आपसात वाटून घेतात. (त्यासाठी त्यांनी स्वत: एक सॉफ्टवेअर बनवले आहे.) हे पैसे घेऊन हे विद्यार्थी आपली फी, मेस बिल्स भरतात. 'टेक्-व्हिजन' ही त्यांची सॉफ्टवेअर कंपनी असून त्यांचे अमेरिकेतील 'बोर्ड-वॉक टेक' नावाच्या कंपनीच्या प्रकल्पावर गेले तीन वर्ष काम चालू आहे व त्यांना 'डॉलर्स' मध्ये मोबदला मिळतो. आता तर त्यांचे भारतीय क्लायंटही आहेत.


दीड हजाराहून अधिक विद्यार्थी गेल्या १६-१७ वर्षात शिक्षण घेऊन 'निवांत' मधून बाहेर पडले आहेत व रु. ५,००० ते रु. ३५,००० कमावत आहेत. शिक्षणक्षेत्र, बँकिंग सेक्टर, लिफ्ट ऑपरेटिंग, सरकारी क्षेत्र, समूपदेशन, नृत्य, ग्रंथालय, कंपन्यांमध्ये नोकरी करत आहेत. अनेकांची लग्नं झाली असून 'निवांत' नातवंडांचे बोबडे बोलही ऐकत आहे. ज्या विद्यार्थ्यांना अनुत्पादक म्हणून आपण सोडून दिलं, ते सर्वजण स्वत:च्या कमाईतला छोटासा भाग दरमहा बाजूला ठेवतात व दरवर्षी 'निवांत'मधील एखाद्या गरजू विद्यार्थ्याचा शैक्षणिक खर्च 'निवांत'च्या कमावत्या विद्यार्थ्यांचा 'सो कान्ट वुई?' हा क्लब करतो. चॉकलेटस् व इतर कमाईतून मिळणाऱ्या प्राप्तीचा १% हे विद्यार्थी ऑटिझम सेंटर व स्किझोफ्रेनिया अवेअरनेस् असोसिएशनला देतात.

आज अंध मुलांना पुरेशा शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'निवांत' सारख्या अनेक संस्थांची गरज आहे. समर्थ माणसांचं गाव वसवायचं तर समर्थ समाजव्यवस्था उभी राहायला हवी, जिचा प्रत्येक व्यक्तीच्या सामर्थ्यावर सकारात्मक विश्वास आहे. जीवनात अडथळे आहेत, प्रश्न आहेत, समस्या आहेत तरीही 'जीवन सुंदर आहे' अन् या जीवनाच्या सौंदर्याला आपण सारे हातभार लावू शकतो.

•••

- मीरा बडवे
निवांत', अंधमुक्त विकासालय,
टिंगरेनगर,विश्रांतवाडी पुणे - ०६

---




मार्क ट्वेनबरोबर एकदा काही साहित्यिक शेक्सपिअरच्या नाटकांची चर्चा करीत होते. चर्चा चालू असतांना शेक्सपिअरची नाटके त्याने स्वत:च लिहिली की दुसऱ्या कोणी लिहून शेक्सपिअरच्या नावावर छापली असा वाद सुरू झाला.
मार्क ट्वेन शेवटी कंटाळून म्हणाला, ''मी स्वर्गात गेल्यावर खुद्द शेक्सपिअरलाच हा प्रश्न विचारीन.''
''परंतु शेक्सपिअर स्वर्गातच कशावरून असेल? तो नरकात असण्याची शक्यता आहे'' एका व्यक्तीने वाद चालू ठेवला.
''असे असेल तर तुम्ही त्याला तो प्रश्न विचारा.'' मार्क ट्वेनने हसत हसत उत्तर दिले.

## हासहासहास

**प्रश्नाचे उत्तर...**


'पहाटे दव का पडते?' या प्रश्नाला रामूने उत्तर लिहिले.
'देवाला ठाऊक!'
उत्तरपत्रिका तपासून आल्या.
त्यात शिक्षकांनी लिहिले होते.
'देवाला पैकीच्या पैकी मार्क! तुला उरलेले शून्य!!'



पळस पेटला ! पळस पेटला !, म्हणू लागले पक्षी । झाडावरती उमटली लालकेशरी नक्षी !

जरूर पाहा... राजाजी राष्ट्रीय उद्यान, इ. स. १९८३, क्षेत्रफळ -८२० कि.मी. (हरिद्वार, उत्तराखंड)

'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) - संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२



## सत्यमेव जयते !

– चि. शौनक हिंगे

''थांबा! मी शरण येतो, पण कृपया मला मारू नका!''

''तू आधी आहेस तिथे थांब, नाहीतर...''

''हो थांबतो, थांबतो. पण कृपया मला मारू नका. मी शरण येतो.''

प्रदीर्घ प्रवासानंतर ॲबे हाती लागला होता. फरार झाल्यानंतर तो जो सुटला होता तो थेट इथपर्यंत. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर तो पकडला गेला होता. पण या पकडापकडीत फार काळ निघून गेला होता.

बऱ्याच वर्षांपूर्वी ॲबे स्लॅनी नावाच्या दुष्ट माणसाने एक क्रूर बेत रचला. 'एअर'च्या (AIR:- Artifical Intelligence Robots) मदतीने, पूर्ण पृथ्वी ताब्यात घेण्याचा त्याचा मनसुबा होता. त्याची सुरुवात त्याने आफ्रिकेत केली.

आपल्या एअरच्या (AIR) मदतीने त्याने आफ्रिकेत अनेक तळ तयार केले. कारण उघड होते, जरी निसर्ग प्रतिकूल असला तरी तेथे त्याला प्रतिकार करू शकेल असे काहीच नव्हते. त्याच्या प्रत्येक तळात 'Teleportation' ची सुविधा तर होतीच शिवाय प्रत्येक AIR मध्ये १,००० HP चे इंजिन व अत्याधुनिक Gamma Guns ही होत्या. आणि कहर म्हणजे प्रत्येक तळात शंभर ते दोनशे AIR होते.

अप्रगत असे कित्येक देश त्याने एअरच्या (AIR) मदतीने काबीज केले आणि आपला मोर्चा पाश्चात्य देशांकडे वळवला. आफ्रिकेत मिळालेल्या विनासंघर्ष विजयामुळे तो हुरळून गेला होता. पूर्ण तयारी न करताच त्याने युरोपवर हल्ला केला.

'आफ्रिकेप्रमाणेच इथेही आपण सहज विजय मिळवू शकू', अशा भ्रमात असतानाच ॲबेला युरोपीय देशांच्या तिखट प्रतिकाराला सामोरे जावे लागले. युरोपचे जरी खूप नुकसान झाले असले तरी ॲबेला अपुऱ्या तयारीमुळे माघार घ्यावी लागली होती.

ॲबे थोडा सावरतो तोच युरोपने त्याच्यावर प्रतिहल्ला केला. युरोपने अमेरिकेची मदत घेतली आणि ॲबेवरचे दडपण वाढले. कधी जग वाचणार असे दिसे, तर कधी नाही ! पण एक वेळ अशी आली की ॲबेला पळून जावे लागले.

ॲबे त्याच्या अत्याधुनिक यानात बसून पळून गेला. पाश्चिमात्य देशांनी त्याचे तळ नष्ट करण्याची जबाबदारी घेतली, तर आशियाने त्याला पकडण्याची. अशी विभागणी जरी करण्यात आली असली तरी भारतीय लोकांमधील चिकाटी, साहस गुण बघून आपल्याला या मोहिमेचे नेतृत्व देण्यात आले.

भारताने आशियातील शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ एकत्र केले आणि त्यांच्यावर असे यान तयार करण्याची जबाबदारी दिली की, ज्याचा वेग प्रकाशाच्या किमान ९०% पर्यंत पोहोचेल व त्यात ॲबेच्या यानापेक्षा कित्येक पटींनी जास्त प्रगत शस्त्रे असतील.

पाच वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर असे यान तयार झाले आणि मी तडक उड्डाण केले.

''ॲबे, आता तू अजून पळू शकत नाहीस. माझी सगळी शस्त्रं तुझ्यावर रोखलेली आहेत. जर मी त्यातील एक जरी सोडलं तर...''

''मि. भोसले, मी म्हटलं ना 'मी शरण येतो' म्हणून.''

''मग चल लवकर.''

''पण मला तुम्हाला एक विचारायचं आहे.''

''ठीक आहे, पण लवकर विचार.''

''सर, तुम्ही माझ्या मागावर गेली कित्येक वर्षं आहात, बरोबर?''

''हो.''

''म्हणजे परत जायला अजून बराच काळ जावा लागेल.''

''अर्थात्.''



वाऱ्यावरती झुलू लागले, बहाव्याचे घोस । पिवळ्याजर्द रंगांचा सडा राजरोस ।।

जरूर पाहा... रणथंबोर राष्ट्रीय उद्यान, इ.स.१९८१, क्षेत्रफळ-३९२ कि.मी.(सवाई माधोपूर, राजस्थान) वाघांसाठी प्रसिद्ध



सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

‘‘एवढ्या वर्षांत पृथ्वीवर बऱ्याच उलथापालथी झाल्या असतील.’’

‘‘उगाच पाल्हाळ लावू नकोस. काय विचारायचं आहे ते लवकर विचार.’’

‘‘सर तुम्ही मला पकडून  करणार तरी काय?’’

‘‘... म्हणजे?’’

‘‘तुम्ही मला पृथ्वीवर नेऊन काय साध्य होणार?’’

‘‘...’’

‘‘काही नाही. तुम्ही मला पृथ्वीवर घेऊन  गेल्यावर काही दिवस तुमचं कौतुक होईल, तुम्हाला थोडेफार पैसे व पुरस्कार मिळतील आणि मग लोक तुम्हाला विसरतील; मग पुढं काय? त्यापेक्षा मी तुमच्या समोर एक चांगला प्रस्ताव ठेवतो. तुम्हाला तो प्रॉक्झिमा सेंच्युरी जवळचा ग्रह माहीत आहे ना? ’’

‘‘हो. तोच ना तो रानटी व अप्रगत लोकांचा?’’

‘‘हो तोच. मि. भोसले, जर आपण पृथ्वीवर न जाता तिथे जाऊन राज्य केलं तर! ’’

‘‘काय ! तुला वेड तर नाही ना लागलं? मी काय रानटी लोकांवर राज्य करायला इतके दिवस तुझ्या मागावर होतो? नाही, ते काही नाही तुला पृथ्वीवरच यावं लागेल.’’

‘‘सर तुम्ही पुन्हा विचार करून पाहा. पृथ्वीवर गेल्यावर पैसे आणि पुरस्कार सोडून अजून काय मिळणार? याउलट जर आपण त्या ग्रहावर गेलो तर आपणही आरामात राहू आणि त्यांची सुद्धा प्रगती होईल.’’

‘‘नाही. आता तू कितीही भूलवलंस तरी मी तुझ्या जाळ्यात अडकणार नाही. मी तुला पृथ्वीवर घेऊन जाणारच.’’

‘‘पण का?’’

‘‘का? अरे मुर्खा, मी एक सच्चा भारतीय आहे आणि एक सच्चा भारतीय कधीही आपल्या निश्चयापासून ढळत नाही. मी एकट्याने नाही, तर पृथ्वीवरील सर्वांनीच तुझा नायनाट करण्याचे ठरवले आहे. तुझाच का? तर सध्या आमच्यासमोर तुझ्याएवढं विध्वंसक दुसरं कोणी नाहीये.

लक्षात ठेव नेहमी सत्याचाच विजय होतो. म्हणूनच तर प्राचीन भारतीय ऋषिमुनींनी म्हणून ठेवलं आहे, ‘सत्यमेव जयते!’

•••

**– चि. शौनक हिंगे** (इ. ९ वी)
फ्लॅट नं. ५, ओंकार अपार्टमेंट, वक्रतुंड सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे ३७

## *गणपती बाप्पा*

पहिले नमन तुला गणपती देवा
सर्वजण करतात तुझी आनंदाने सेवा ।।धृ. ।।

तुझ्याजवळ आहे संकटे निवारण्याची शक्ती
म्हणूनच सर्वजण करतात तुझी भक्ती ।।१ ।।

कोणत्याही कार्यात देवा तुला पहिलं स्थान
तुझ्यानंतर असतो सर्व देवांचा मान ।।२ ।।

देवा तू आम्हाला देतोस ज्ञान
तुझ्यामुळेच वाढते उंदीरमामाची शान ।।३ ।।

बाप्पा तू जाताना डोळा पाणी येते
बाप्पा तू गेल्यावर घर उदास वाटते ।।४ ।।

तू तर सर्वांचा बेस्ट फ्रेंड असतोस
म्हणूनच तू सर्वांना फार आवडतोस ।।५ ।।

देवा आम्ही सगळे तुमचीच बघतोय वाट
करण्यासाठी अनेक संकटांचा नायनाट ।।६ ।।

कु. शलाका पोंक्षे (इ. ८ वी)
‘रविकिरण’ ११ अ, स्वानंदनगर,
बैतुरकर पाडा, कल्याण (प)

सप्तरंगी इंद्रधनुष्य, चोचीमध्ये धरून । गिरक्या घेत पक्षी येतात, निळ्या समुद्रावरून ।।



**जरूर पाहा... श्री वेंकटेश्वर राष्ट्रीय उद्यान**, इ. स. १९८९, क्षेत्रफळ-३५३ कि.मी. (तिरुपती, आंध्रप्रदेश)

**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार -** संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

# ‘छात्र प्रबोधन’ – वर्ष तेरा : अंकातील विशेष लक्षवेधी

**सौर अश्विन शके १९३४ ते सौर भाद्रपद शके १९३५ (इ.स. २०१२ – २०१३)**

| **आढावा : संख्यात्मक सारणी (वर्षभरात येऊन गेलेले एकूण साहित्य)** | | |
|---|---|---|
| कथा – २१ | कृतिपर–विज्ञान/कला/प्रकल्प– २१ | सर्वांगीण विकसन – ३ |
| कविता – २८ | व्यक्तिपरिचय– ३ | लेखमाला – ३ (एकूण लेख– १८) |
| ललित – २३ | भटकंती – ४ | संस्था परिचय – ३ |
| गंध मोहवी काव्याचा – १ | जरूर वाचा/पाहा – ५ | **लेखक–कवी/चित्रकार – ११५/४०** |
| माहितीपर – १९ | आपल्या आसपास – १ | **एकूण पृष्ठे – ५२०** |

**दिवाळी अंक** ‘छात्र प्रबोधन’ तर्फे यावर्षी कुमार वयोगटातील मुलामुलींसाठी मराठी, इंग्रजी, ग्रामीण व बोलका असे चार स्वतंत्र दिवाळी अंक तर युवक–युवतींसाठी ‘युवोन्मेष’हा अंक प्रकाशित करण्यात आला. याशिवाय चारही अंकांची एकत्रित संगणकीय आवृत्तीही (पीडीएफ स्वरूपात सीडी) प्रकाशित करण्यात आली. यात मराठी २५,०००, इंग्रजी ७,०००, ग्रामीण १३,०००, युवोन्मेष ४,००० बोलका अंक ९००, संगणकीय पीडीएफ अंक ६०० असा एकत्रित प्रकाशनपूर्व नोंदणीचा आकडा ५०,००० च्या वर गेला. तसेच अंध मित्रांसाठी यावर्षीही मराठी अंकाचे ब्रेल लिपीतले रूपांतर प्रकाशित करण्यात आले. बोरीवली व औरंगाबाद या ठिकाणी हे ब्रेल लिपीतील अंक पाठविण्यात आले.

**लेखमाला** • (गतवर्षीची लेखमाला पुढे चालू) **चित्रगोष्टी** :– चित्रांचे प्रकार, चित्रांचे संस्कार या सगळ्या ‘चित्र’ गोष्टींबद्दल मुलांशी संवाद. शिवाय चित्रकलेच्या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मुलांना उपयुक्त– *अंक ८– संकल्प चित्र–* लेखिका **–चित्रा वैद्य • निर्णयातील स्वावलंबन –** निर्णयातील स्वावलंबन याविषयाचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी. *अंक २. निर्णय घेण्याच्या वाटेवर, निर्णय घेताना, तूच ठरव (कविता), माझे निर्णय : किती महत्त्वाचे? कोण घेते?, छापा का काटा, छत्रपतींची अद्‌भुत निर्णयक्षमता, निर्णयाचा क्षण ४. क्रीडा आणि निर्णय कौशल्य ५. उद्योजकतेच्या वाटेवर... ६. निर्णय कौशल्य ७. निर्णयातील प्रभाव व स्वभाव ८. निर्णयातील स्वावलंबन जीवनाचे स्वावलंबन ९. निर्णयामागच्या भावना ११, १२. गटात निर्णय घेताना...१ व २* **(ही लेखमाला वाचून कुठले निर्णय तुमचे तुम्ही घेण्यास सुरुवात केली, हे आम्हाला कळवणार?)**

• **विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता –** विज्ञान तंत्रज्ञानातील तुमच्या कल्पकतेला धुमारे फुटण्यासाठी – *अंक ७. कल्पकता आपल्या आसपासची ८. चला वस्तूंचे गुणधर्म बदलून बघूया! ९, १२ जादुई रूपांतरण.*
लेखिका – **डॉ. नलिनी गुजराथी (या लेखांखालील दिलेले कृतिपाठ तुम्ही करून बघताय ना? )**

**‘संवादातून’ केलेली कृतिपर आवाहने** **अंक १** – १) सार्वजनिक सण–उत्सवात पुढाकार घेऊन जबाबदारीने, हिरिरीने उत्साही वातावरणावर स्वार व्हा. छोटे–मोठे संकल्प ठरवून करा. व त्यामागील उद्दिष्टांचा डोळसपणे पाठपुरावा करा. **अंक २** – १) स्वामीजींच्या दीडशेव्या जयंती निमित्त त्यांचे विचार समजून घेऊन आचरणात आणण्याचा प्रयत्न करा. २) प्रतिसादी व्हा! आवडलेल्या गोष्टी–चित्र, लेखक, चित्रकारांपर्यंत आवर्जून पोहोचवा. **अंक ३** – १) विद्यार्थ्यांचं लेखन अभ्यासापुरतच मर्यादित राहतं (गृहपाठ–स्पर्धा–परीक्षा) स्वत:हून, स्वत:ला जे मनापासून वाटतं ते कागदावर लिहायचा प्रयत्न करा. स्वत:ला जे वाटतं ते व्यक्त करण्याचं लेखन हे प्रभावी माध्यम आहे. तेव्हा अभ्यासाव्यतिरिक्त इतर वेळीही या माध्यमाशी दोस्ती करा. **अंक ४** – प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आचार–विचार ‘स्वदेशी’ होण्याचा प्रयत्न करत आसपासच्या घटनांबद्दल संवेदनशील, प्रतिसादी होण्याचा संकल्प करा. **अंक ५** – राष्ट्रीय विज्ञान





**NTS** मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

दिनाच्या निमित्तानं तंत्रज्ञानाचा डोळस वापर करण्याचं ठरवा. **अंक ६** – सुट्टीत स्वत:मधील 'प्रज्ञावंतता' शोधून ती विकसित करायला जोडीकार्य, गटकार्य, छात्र प्रबोधन मध्ये कामाचा अनुभव, विद्यार्थी संपादक मंडळ अशा संधी उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधनमध्ये सुट्टीतला हा अनुभव शिकण्यासाठी सज्ज व्हा. **अंक ७** – भोवतालच्या परिस्थितीची संवेदशीलतेनं सह–अनुभूती घ्या. **अंक ८** – भविष्यात सामाजिक जाणिवेने काम करण्याची पूर्व तयारी म्हणून सुट्टीत आत्तापासून सामाजिक कार्यामध्ये छोटी–मोठी कामे करून त्यातून आपले संकल्प अधिक बळकट करा. **अंक ९**– येत्या शैक्षणिक वर्षात तुमच्या आड दडलेल्या अनेकानेक क्षमतांना व्यक्त होण्यासाठी छान संकल्प करून ते पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न करा. क्षमता ताणणाऱ्या प्रसंगांना आपणहून सामोरे जा. **अंक १०** – अभिव्यक्तीसाठी भाषेचा प्रभावी वापर करून भाषा समृद्ध करा. **अंक ११** – १५ ऑगस्टच्या निमित्ताने देशभक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणीय विचार याविषयी डोळस विचार करून त्याला कृतीची जोड द्या. **अंक १२** – व्यक्तिमत्त्व विकसनासाठी व स्वयं शिक्षणासाठी छात्र प्रबोधन एक साधन म्हणून त्याचा डोळसपणे उपयोग करा.

**लेखांखालील कृती** **अंक १** – *'रेझांग' ला ची लढाई,* भारत–चीन युद्धावरची काही पुस्तके आवर्जून वाचा. (पुस्तकांची यादी अंकात दिली आहे. **यांपैकी कुठली पुस्तके तुम्ही वाचली?**) ५) *कागदी होड्या* – मल्हार अरणकल्ले पावसाच्या आठवणी सांगणारा या तरल लेखाप्रमाणेच हिवाळा/उन्हाळा या ऋतुंमधले तुमचे अनुभव तुम्ही लिहून पाठवा. **अंक ६**– १) *घरच्या घरी सायकल दुरुस्ती* – कारागिराकडून पंक्चर काढण्याविषयी माहिती गोळा करा. २) परीक्षेला सामोरे जातांना शरीराची व मनाची प्रसन्नता वाढवून ताण कमी करण्यासाठीच्या कृती.

**अंक ७** – १) *रंग–गंधोत्सव* – पावसाळ्यात फुलणाऱ्या विविध फुलांची शास्त्रीय माहिती मिळवा. साहित्यात या लेखातील फुलांचे वर्णन असणाऱ्या कवितेच्या ओळी मिळवून पाठवा. २) गंगु गायीची गोष्ट – 'वऱ्हाडी' बोली भाषेत लिहिल्या गेलेल्या या कथेतील भाषेचा अभ्यास करा. तुम्ही शिकत असलेली 'प्रमाणं मराठी भाषा व कथेतील बोली भाषा यात कोणता फरक जाणवतोय' त्याची नोंद करा. **अंक ९** – *चला ठरवून काही करूया!* संकल्प तक्ता – तक्त्यानुसार संकल्प करा. **(आत्तापर्यंत संकल्पातील कोणत्या गोष्टी केल्या त्याची नोंद ठेवा.) अंक १०** – 'झिम्मड पावसाची' या चित्रमालिकेतील चित्रांची वर्णने तुमच्या शब्दात करा. **अंक ११** – १) बोली भाषेत आलेल्या शब्दांचा अर्थ समजावून घेऊन प्रमाणभाषेत त्याला समानार्थी शब्द शोधा. २) विज्ञानाच्या पुस्तकातील शोध–शोधकांच्या माहितीच्या संदर्भात त्याविषयीचे मूलभूत संशोधन त्यापूर्वी कुणी केले असेल त्या शोधकर्त्याची माहिती मिळवा. **(किती 'संवादातील' कृतींना तुम्ही प्रतिसाद दिलात? किती लेखांच्यावर आधारित कृती तुम्ही करुन पाठवल्या आहेत ? तुमच्या सकारात्मक कृतींची, तुमच्या प्रतिसादाची आम्ही खूप वाट बघत आहोत.)**

**तळटिपा** ● एक विशिष्ट सूत्र डोळ्यासमोर ठेवून अंकात पानाखालील माहितीपर ओळी दिल्या गेल्या. त्या ओळींचा वापर मुलांना वक्तृत्व, प्रकल्प, निबंधलेखन व त्या त्या विषयांचे एकत्रित संकलन म्हणून करता येऊ शकेल. ३. *राज्य - तेथील भाषा व निर्मिती दिन ७. भारतरत्न पुरस्कार - व्यक्ती, क्षेत्र व पुरस्कार दिलेले वर्ष ८. लेण्या आणि गड-किल्ले - अनुक्रमे कितव्या शतकातील आहे, उंची, ठिकाण व वैशिष्ट्ये ९. भारतातील वैशिष्ट्यपूर्ण संग्रहालयांची माहिती - कुठे आहे व कशाचा संग्रह व त्याचे वैशिष्ट्यं १०. छंद जोपासण्यासाठी संकेतस्थळे ११. धबधब्यांची माहिती – उंची, ठिकाण.* १२. राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये – स्थापना वर्ष, क्षेत्रफळ, ठिकाण, राज्ये ● त्याशिवाय पानांखालील कवितेच्या ओळी संगीता बर्वे, श्रीनिवास शारंगपाणी, चंद्रकांत वानखेडे या कवींच्या होत्या. तर काही पावसाळा या ऋतूशी व अन्य मिश्र विषयाच्या होत्या.



जर्द उन्हाची सोनपाखरे, कशी उतरली धरणीवरती । चमचमणारी फुले दवाची, कशी उमलली गवतावरती ।।



**जरूर पाहा... ताडोबा राष्ट्रीय उद्यान,** इ. स.१९५५, क्षेत्रफळ-६२५ कि.मी. (चंद्रपूर, महाराष्ट्र) व्याघ्र प्रकल्पासाठी

UPSC परीक्षा पूर्वतयारी वर्ग - स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

## ‘छात्र प्रबोधन’ च्या मेळावे, स्पर्धा, उपक्रम, यांचा संक्षिप्त आढावा.

**मेळावे** • **संपर्क मेळावे :** वर्षभरात चाळीसगाव, कोल्हापूर, अकोला या तीन ठिकाणी वाचक मेळावे घेतले गेले. त्यातून सुमारे ८०० विद्यार्थी, १०० अध्यापक, संस्थांचे पदाधिकारी, बहुसंख्य पालक यांच्याशी संवाद व संपर्क साधला गेला. **छात्र प्रबोधन शिबिरार्थी मेळावे :** छात्र प्रबोधनच्या विविध शिबिरांना यापूर्वी येऊन गेलेल्या पदव्युत्तर युवक-युवतींचा **युवोन्मेष मेळावा** व पदवीपूर्व युवक-युवतींचा **युवा मेळावा** पार पडला. यानिमित्ताने सुमारे ४५० युवक-युवतींशी संपर्क झाला व त्यांची माहिती संगणकावर अद्ययावत करण्यात आली.

• **सभासद पालक मेळावा-पुणे :** २ सप्टेंबर २०१२ रोजी छात्र प्रबोधनच्या पुण्यातील सभासदांसाठी एक मेळावा आयोजित केला गेला. सुमारे ५० सभासद व त्यांचे ५० पालक या मेळाव्यात सहभागी झाले होते. सभासदांशी ओळख व प्रत्यक्ष संवाद असा या मेळाव्याचा हेतू होता. लेखकांशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवरून संवाद हा या मेळाव्याचा महत्त्वाचा भाग होता. **मासिकावर आधारित मेळावे :** यंदा ग्रामीण दिवाळी अंकाबरोबरच मराठी व इंग्रजी दिवाळी अंकांवरही मेळावे घेतले गेले. एकूण २० ठिकाणी मेळावे घेतले व त्यात १२०० विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. **(तुम्ही कधी अंकावर आधारित मेळावा कधी घेताय ?)**

**स्पर्धा** • **हस्तलिखित स्पर्धा :** यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातून २८ शाळांमधील ५९ संघांनी हस्तलिखित स्पर्धेत भाग घेतला होता. सुमारे ८५० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. सर्व विजेत्या संघांना (८ संघ) पुस्तके, रोख रक्कम व प्रशस्तिपत्रक बक्षीस म्हणून देण्यात आले. विशेष गुणवत्ता श्रेणीतील हस्तलिखितांना प्रशस्तिपत्रक देण्यात आले. **(या वर्षी तुमचा देखील सहभाग स्पर्धेत असणार आहे ना !)** • **इंग्रजी हस्तलिखित स्पर्धा :** इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी पहिल्यांदाच हस्तलिखित स्पर्धा आयोजित केली गेली. या स्पर्धेमध्ये ७ शाळांमधील १३ संघांनी भाग घेतला होता. यामध्ये ७१ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**उपक्रम** • **जोडीकार्य व साहस सहल :** एप्रिल-मे २०१३ या कालावधीत छात्र प्रबोधन तर्फे ‘जोडीकार्य’ हा ‘दूरस्थ अनुभव’, उपक्रम राबविण्यात आला. त्यात इंदापूर, कर्जत, मुंबई, पुणे येथील सुमारे २५ जोड्यांनी भाग घेतला व जोडीकार्यातील त्यांना नेमून दिलेली कामे यशस्वीरित्या पूर्ण केली. अशा प्रकारची कामे करून धमाल अनुभवांबरोबरच मुलांमधला आत्मविश्वास वाढला, आपल्याच अंगचे सुप्त गुण त्यांना कळले. अशी यशस्वीपणे जोडीकार्य पूर्ण करणाऱ्यांसाठी धमाल साहस सहल आयोजित केली होती. **(या जोडीकार्यात तुमचा सहभाग कधी असणार आहे? कळवणार?)**

**द्विदशकपूर्तीनिमित्त विशेष** • **अंक संगणकावर पाहा/ऐका :** अंकातील पानांची मर्यादा लक्षात घेऊन तसेच कुमारांची आधुनिक ई माध्यमाशी वाढत चाललेली दोस्ती लक्षात घेऊन छात्र प्रबोधनच्या लेखांना ऑडिओ/व्हिडिओद्वारे पूरक जोड द्यायला यावर्षी प्रायोगिक स्तरावर सुरुवात झाली आहे. आत्तापर्यंत २५ लेखांना ही जोड दिली गेली. **(तुम्ही पाहिलेत यातले काही! नसल्यास आवजूर्न पाहा. लिंक – www.activel.in)**

**माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन– ‘प्रतिक्रिया’ :** छात्र प्रबोधनच्या द्विदशकपूर्तीनिमित्त मासिकाशी निगडित असलेल्या जाहिरातदार, प्रायोजक, केंद्रप्रमुख, लेखक, सभासद, पालक व अन्य मान्यवर यांच्याकडून ‘छात्र प्रबोधनच्या आत्तापर्यंतच्या वाटचालीबद्दल त्यांना काय वाटते’ याबाबतच्या लेखी प्रतिक्रिया मागविल्या होत्या. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया गेले वर्षभर दरमहा अंकामध्ये प्रसिद्ध केल्या गेल्या. **(तुमच्या प्रतिक्रिया केव्हा पाठवताय?)**

**प्रकाशने** : गेल्या वर्षभरात छात्र प्रबोधनतर्फे ७ पुस्तकांची पुढची आवृत्ती / पुनर्मुद्रणे प्रकाशित झाली. आज अखेर ‘छात्र प्रबोधन’ने एकूण ५८ पुस्तके प्रकाशित केली आहेत. **(त्यापैकी तुमच्याकडे किती पुस्तके आहेत? या वर्षी छात्र प्रबोधनची किमान ५ पुस्तके तरी आवर्जून संग्रही ठेवा; यादी शेवटच्या पानावर.)**

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०१३-प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी स्थानिक केंद्रे

प्रिय प्रबोधक,

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्र व गोव्यात गावोगावचे कार्यकर्ते अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात.

खालील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनचे काम करणारे काका-काकू किंवा ताई-दादा आहेत. यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्हीही त्यांच्याबरोबर सहभागी होणार ना? छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक आपल्या अनेक मित्र-मैत्रिणींना सवलतीच्या दरात नोंदवायला सांगा. तसेच इतरही अंकांची नोंदणी तुमच्यासाठी व तुमच्या परिचयातल्या व्यक्तींसाठी आवर्जून करा. ३१ ऑगस्टपूर्वी दिवाळी अंकाचे प्रचार साहित्य खालील केंद्रांवर उपलब्ध असेल. तुम्ही त्याचाही उपयोग करून तुमच्या शाळेत व परिसरात नोंदणी करू शकता. तसेच छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित पुस्तकांचीही नोंदणी करा. (सूची मलपृष्ठाच्या आतील पानावर दिली आहे.)

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु. ४०/- जादा भरले आहेत त्यांनाच दिवाळी अंक खात्रीशीरपणे पाठविले जातील.

**मराठी** अंकाबरोबरच **इंग्रजी, ग्रामीण, 'युवोन्मेष'** असे चार अंक शिवाय **संगणकीय आवृत्ती** प्रकाशित होणार आहे.

### विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

| | | |
|---|---|---|
| बोरीवली | - सौ. सुमिता पांढरे | ☎ ९९६९०५१५७३ |
| विलेपार्ले | - श्री. दत्तात्रय जोशी | ☎ ९८६९०६३७७२ |
| बांद्रा | - श्री. मिलिंद चिंदरकर | ☎ ९३२२२४२५६९ |
| गिरगाव | - श्रीमती शिरीषा खरे | ☎ २२-२३८८६९३५ |
| चेंबूर | - कु. मधुरा पंडित | ☎ ९८६९४५०००१ |
| विरार-वसई | - श्री. फ्रान्सिस डिमेलो | ☎ ९८५०१८२६६१ |
| पालघर | - श्री. तुषार राऊत | ☎ ९८६०२०३१०० |
| दादर | - श्री. सतीश पै | ☎ ९८२०२६७३२७ |
| अंधेरी | - सौ. धनश्री शिंदे | ☎ ९७०२५२७२८४ |

### विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

| | | |
|---|---|---|
| ठाणे | - सौ. सुप्रिया बर्वे | ☎ ९८६९११५०४१ |
| डोंबिवली | - सौ.ज्योती कर्वे | ☎ ९९६९६१५८४७ |
| कल्याण | - सौ. स्मिता मनोरे | ☎ ९९२०९४८७७८ |
| अंबरनाथ | - सौ. अश्विनी कुलकर्णी | ☎ २५१-२६०१४११ |
| बदलापूर | - श्री. चिंतामणी उगले | ☎ ९४२३०८९७७४ |

### विभाग ३. अलिबाग (रायगड, नवी मुंबई)

| | | |
|---|---|---|
| खोपोली | - श्री.सुहास सेलूकर | ☎ ९५६१८४५१०६ |
| अलिबाग | - श्री.राम जोशी | ☎ ९४२०८३५६५० |
| नागाव | - सौ. स्नेहा जोशी | ☎ २१४१-२४५६६१ |
| नागोठणे | - सौ. सुलभा गोखले | ☎ २१९४-२७७९०३ |
| मुरुड | - सौ. दीपाली जोशी | ☎ ९९६०८६६१७७ |
| देवगड | - श्री. जयेश खाडिलकर | ☎ ९४०३५९५१७५ |
| महाड | - श्री. डी. एस्. सावंत | ☎ ९८२२६२६९३२ |
| रसायनी | - सौ.शुभदा कोकीळ | ☎ ९८८१९०३६७३ |
| पनवेल | - सौ. गुंजन कुलकर्णी | ☎ ९९३०८८२८७० |
| सानपाडा | - सौ. शीला ठाकूर | ☎ ९८६९४३८७०४ |
| वाशी | - सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर | ☎ २२-२७८०१९६८ |

### विभाग ४. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग )

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी | - सौ. प्रतिभा प्रभुदेसाई | ☎ २३५२-२२२९५३ |
| पावस | - सौ. शीतल सामंत | ☎ ९४२११३९५३० |
| चिपळूण | - श्री. प्रसाद काणे | ☎ ९४२२४३०९०० |
| राजापूर | - श्री. संजय कुलकर्णी | ☎ ९४२१२२९७५७ |
| खेड | - सौ. नम्रता दामले | ☎ ९४२२४३३९४९ |
| कुडाळ | - श्री. उमेश सामंत | ☎ ९४२२९६३५१७ |
| सावंतवाडी | - सौ. वंदना करंबेळकर | ☎ ९८५०४७३०१२ |
| कणकवली | - श्री. औदुंबर भागवत | ☎ ९४२११४७५१३ |
| लांजा | - डॉ. अशोक शहाणे | ☎ ९४२११८९२४७ |

### विभाग ५. फोंडा (गोवा)

| | | |
|---|---|---|
| फोंडा | - श्री. मोहन आमशेकर | ☎ ९४२२०५८८७३ |
| मार्दोळ | - श्री. शिरीष आमशेकर | ☎ ९४२११५८९२२ |
| मडगाव | - सौ. विनया शिंक्रे | ☎ ९४२३८२०३३२ |
| वास्को | - सौ. दिपा गावकर | ☎ ९९२१८९७०९६ |
| परवरी | - श्री. वल्लभ केळकर | ☎ ९४२०८१८४८३ |



इतुके अवजड सहजपणे हे कोण पेलते इंद्रधनु । नाद कसा हा नदीस येई रुणुझुणु हो रुणुझुणु ।।



**जरूर पाहा...डेझर्ट राष्ट्रीय अभयारण्य,** इ. स.१९८०, क्षेत्रफळ-३१६२ कि.मी. (जैसलमेर, राजस्थान)

**युवक युवतींसाठी प्रिपरेटरी व फाउंडेशन कोर्स**-डिसेंबरपासून नवीन तुकडी-नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ०२०-२४२०७१७९

म्हापसा - श्री. प्रशांत बर्वे ☎ ९४२२४५६५५५
डिचोली - श्री. गणेश जोशी ☎ ९४०५९२१२३१

### विभाग ६. इचलकरंजी (कोल्हापूर)

कोल्हापूर - सौ. रेश्मा जोशी ☎ ८८०५००४२२१
इचलकरंजी- श्री.विनायक गद्रे ☎ ९८८१५९००१८
कुरुंदवाड - श्री. गोपाळ जोशी ☎ ९८५०९६४८१९
हुपरी - सौ. सुधा सांगवडेकर ☎ ९०२८८५२०५२
महागाव - श्री. सुभाष सुतार ☎ ९०९६७१२८१३

### विभाग ७. सांगली

सांगली - श्री. शैलेंद्र केळकर ☎ ९४२२६१६०५८
तासगाव - श्री. प्रसाद हसबनीस ☎ ९४२३८१०४०९
३२ शिराळे- श्री. नाथाराव हसबनीस ☎ ९७६७६८०७०१
कडेगाव - डॉ. मकरंद बर्वे ☎ ९९२२२१२९०३
इस्लामपूर - सौ. स्वाती कुलकर्णी ☎ ९४०४३५९२६२
मिरज - श्री. संजय कुलकर्णी ☎ ९४२३२६९५४६

### विभाग ८. सातारा

सातारा - श्री. सतीश कुलकर्णी ☎ ९४२३२६०२६०
कोरेगाव - डॉ. मिलिंद शहा ☎ ९८२२०२३२०८
कराड - श्री. दत्तात्रय कुलकर्णी ☎ २१६४-२२२५०५
उंब्रज - डॉ. धनंजय कुलकर्णी ☎ ९४०३५४६९१३
खंडाळा - श्री. अरुण फाळके ☎ ९८९०६०९६३१
पाटण - श्री. दत्तात्रय नांगरे ☎ ८२७५४५७२७८
खटाव वडूज-सौ. पूनम शिंदे ☎ ९९७५५९९८५१

### विभाग ९. सोलापूर

सोलापूर - ज्ञान प्रबोधिनी ☎०२१७-२३१७७८२
पंढरपूर - श्री. दीपक इरकल ☎ ९४२३५६३८९५
मोहोळ - श्री. बापूसाहेब दळवे ☎ ९८५०३६३४८८

### विभाग १०. कर्जत (अहमदनगर)

नगर - सौ. स्नेहल धर्माधिकारी ☎ ९४२२०८४६१३
संगमनेर - श्री. अशोक भारंबे ☎ ९९२१६४४२११
कोपरगाव - डॉ. अंजली फडके ☎ ९३२५९५०१२१
शिर्डी - डॉ. प्रबोध जोशी ☎ ९४२१५५८४६६
कर्जत - श्री. दिपक लांगोरे ☎ ९४२३४६५६४७
पारनेर - सौ. सविता रेपाळे ☎ ९९२२२५१६६७

### विभाग ११. उत्तर महाराष्ट्र

नाशिक - श्री. अनिल दंडगव्हाळ ☎ ९४२२२४८२६४
बोलठाण - डॉ. सुभाष जोशी ☎ ९८८१८२६६०१
मालेगाव - डॉ. रागिणी भेलसेकर ☎ ९५०३२२२३९६
धुळे - श्री. एन. एम. जोशी ☎ ९४२१५००८८२
देऊर बु।। - श्रीमती स्वरूपा देवरे ☎ ७५८८६२८८११
साक्री - श्री. चंद्रकांत पंचभाई ☎ ९४२१५३७५०४
शिरपूर - प्रा. वैशाली पाटील-देवरे ☎ ९८२३२९९९७३
दोंडाईचा - श्री. सुभाष जैन ☎ ९८२३४१६८४४
नंदूरबार - डॉ. वैशाली काणे ☎ ९४२३९८०२९६
शहादा - सौ. सुनीता पटेल ☎ ९४२०२७११०१
जळगाव - श्री. अनिल भोळे ☎ ९४२०६६२७१४
अमळनेर - श्री. दत्तात्रय सोनावणे ☎ ९४२०११११८२
भडगाव - डॉ. सुवर्णा पाटील ☎ ७५८८०१०६७५
चोपडा - श्री. सुधाकर केंगे ☎ ९४२३९१५५२९
चाळीसगाव- डॉ. मुकुंद करंबेळकर ☎ ९८२२२६३२७९
भुसावळ - श्री. अनिल जोशी ☎ ९३२६११८०२८

### विभाग १२. मराठवाडा

औरंगाबाद - चि. शुभम जोशी ☎ ९४०३६२९१३८
कन्नड - श्री. प्रशांत कोटकर ☎ ९४२१५१४६७६
जालना - श्री. विजय देशमुख ☎ ९४२३४५७६५५
बीड - श्री. कैलास लिंगे ☎ ९८८१४५१३५७
गेवराई - श्री. सदानंद कुलकर्णी ☎ ९४२२७०७४६८
अंबाजोगाई - ज्ञान प्रबोधिनी ☎ ९४२१६२२६०९
माजलगाव - श्री. निरंजन वाघमारे ☎ ९८८१८६७१२३
धाराशिव - श्री. बालाजी माळी ☎ ९४०३३९११०६
हराळी - ज्ञान प्रबोधिनी ☎ ८८८८८०२६०४
लातूर - श्री. अमोल होनमाळे ☎ ८१४९९६०५५५
परभणी - श्री. प्रताप देशपांडे ☎ ९४०४९७४६१९
सेलू - श्री. भालचंद्र गांजापूरकर-जोशी ☎ ९४२२८६९५२२
वसमतनगर- श्री. जी. आर.आर्किलवाड ☎ ९८२२८८८३०६
नांदेड - सौ. मीरा तातोडे ☎ ९८८१०९१०५४

### विभाग १३. विदर्भ

नागपूर - सौ. ओजस्विनी जामदार ☎ ९६७३१३३३८८
अकोला - श्री. भूषण बापट ☎ ९८५०३८६४९४
वाशीम - डॉ. सुनिता घुडे ☎ ९८२२२०४५१५
अमरावती - श्री. प्रदीप व्यवहारे ☎ ९८६०६७४७७२
वर्धा - श्री. मंदार देशपांडे ☎ ९४२०४१५६४८
यवतमाळ - श्री. उदय नवलेकर ☎ ९९२३३०५७८५
उमरखेड - श्री. धनंजय कुदे ☎ ९४०३४६००४८
चंद्रपूर - श्री. मुकुंद घरोटे ☎ ९०११६३१६५८
वरोरा - श्री. उमेश लाभे ☎ ९४०३२४२७०५

### विभाग १४. पुणे

पुणे शहर - छात्र प्रबोधन मुख्य केंद्र ☎ २०-२४२०७१७४
निगडी - ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय ☎ २०-२७६५४३८०

झाड केवळ स्वत:साठी मोहरून येतं काय? पाखरू फक्त स्वत:साठी गोड गाणं गातं काय?

**जरूर पाहा... सुलतानपूर पक्षी अभयारण्य,** इ. स.१९८९, क्षेत्रफळ-१.४३ कि.मी. (सुलतानपूर,हरियाणा)

**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम -** नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

चिखली - श्री. गौतम इंगळे ☎ ९७३०२३७३८८
साळुंब्रे - ग्राम प्रबोधिनी विद्यालय ☎ २११४-२२३३७१
शिवापूर - श्री. संजीव तागडे ☎ २०-२४३८४०१३
इंदापूर - श्री. तुषार रंजनकर ☎ ९४२२३२९६१६
चाकण - डॉ. अविनाश अरगडे ☎ ९४२३५७१५५२
शिरूर (घोडनदी)-श्री. प्रशांत अवचट ☎ ९८८१०४९४३८
बारामती - सौ. मयुरा कानिटकर ☎ ९४२३५८४३२४
सासवड - सौ. कल्पना खांडेकर ☎ ९४२३२०८१०१
भोर - सौ. शुभांगी मुकादम ☎ ९६२३०९३९६०

**अधिकाधिक गावांमध्ये छात्र प्रबोधनची नोंदणी व वितरण केंद्रे व्हावीत यासाठी सभासदांना आवाहन !**

मागील वर्षी ११९ गावांमध्ये स्थानिक केंद्रप्रमुखांनी स्वयंस्फूर्तपणे 'छात्र प्रबोधन'दिवाळी अंकाचे नोंदणी व वितरण केंद्र सांभाळले होते. येत्या ५ वर्षात महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी व तालुक्याच्या ठिकाणी वितरण केंद्रे सुरू व्हावीत असे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. त्यानुसार यावर्षी काही जिल्हे व तालुक्यांच्या ठिकाणी नव्याने वितरण केंद्रे सुरू करावयाची आहेत. आपण स्वत:/आपले आईवडील अथवा आपल्या संपर्कातील, परिचितांपैकी स्वयंस्फूर्तीने त्या-त्या गावी केंद्र सुरू करू शकतील, अशा व्यक्ती असल्यास त्यांची नावे, दूरभाष क्रमांक कळवावे म्हणजे त्यांच्याशी संपर्क करता येईल. या केंद्रप्रमुखांनी किमान ५० दीपावली अंकांची नोंदणी करावी व मासिकाचे किमान ५ सभासद करावेत ही अपेक्षा आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नांमुळे मागील वर्षी नोंदणीचा टप्पा ५० हजाराच्या वर गेला होता, यंदा ६० हजारांचे उद्दिष्टही आपण नियोजनपूर्वक पार पाडूया. इच्छुकांनी त्वरीत मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा. (श्री. रवींद्र भोसले - ९८५०७३१०७१) त्यांना आवश्यक ते प्रचार व नोंदणी साहित्य व अन्य तपशील पाठवले जातील.

## लेखकाच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

**छात्र प्रबोधन**
**२० वर्षांची वाटचाल**

### दीप जलता रहे !

**आजकाल जमाना 'पॅकेज' चा आहे. शिक्षणपद्धतीत 'पॅटर्न्स' ची चलती आहे. प्रतिभेचे उन्मेष कुचमत आहेत. प्रयोगशीलतेला प्रोत्साहन नाही. नेतृत्वगुणाची कदर नाही. बढाईखोर आणि पोपटपंची करणारे विद्यार्थी वेगाने तयार होत आहे अशा पार्श्वभूमीवर 'छात्र प्रबोधन'सारखे खास कुमारांकरीता गेली २१ वर्षे चालू असलेले ध्येयवादी मासिक हा एक आशेचा किरण आहे. हा दिवा निरंतर तेवत राहो.**

**– श्री. म. वि. कोल्हटकर, सातारा** (ज्येष्ठ लेखक)

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० भाद्रपद, शके १९३५,1 सप्टेंबर २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

## दिवाळी म्हणजे फटाके-फराळ, किल्ला-आकाशकंदील आणि

# छात्र प्रबोधनचे ५ दिवाळी अंक

**(मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष व संगणकीय अंक)**

**कथा, कविता, ललित लेख, माहितीपर लेख, खेळ, विज्ञान प्रयोग, प्रेरणादायी लेखमाला यांचा मस्त खजिना या दिवाळीच्या सुट्टीत लुटायचाय ना? त्यासाठी तय्यार ना?**

सभासदांना त्यांचा मराठी दिवाळी अंक जवळच्या केंद्रावरून मिळेलच !
पण या खजिन्यातल्या इतर अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणीही करायला विसरायचं नाहीये हं !

**– दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत –**

| मराठी | इंग्रजी | ग्रामीण | युवोन्मेष | चारही अंकांचा एकत्रित |
|---|---|---|---|---|
| ₹ ४० | ₹ ४० | ₹ ३० | ₹ ४० | संगणकीय (Pdf) अंक ₹ ५० |

आजच आपली व आपल्या मित्र–मैत्रिणी, चुलत–मामे–आते –मावस भावंडे यांची नोंदणी पक्की करा.

**प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक १ऑक्टोबर २०१३**

वेगवेगळे **दिवाळी अंक, व पुस्तके** यांची रक्कम भरून नोंदणी १ ऑक्टोबरपर्यंत स्थानिक केंद्रावर करा व दिवाळी अंकासोबत ते केंद्रावरून घेऊन जा.

# ज्ञान प्रबोधिनीची कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !**

**✻ कथासंग्रह**

| | |
|---|---|
| दरवळ | ४०/– |
| मृद्गंध | ६०/– |
| बहर | ५०/– |
| मोहोर | ६०/– |
| कहाणी दोन भावांची | ३०/– |
| मृदुभाव जागे होता... | ३०/– |
| प्रेरक कथा | ४०/– |

**✻ ललित लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| अलगुज | ५०/– |
| केवड्याचं पान | ५०/– |
| बकुळफुलं | ६०/– |

**✻ नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह**

| | |
|---|---|
| गंध मोहवी काव्याचा – भाग १ व भाग २ प्रत्येकी | ७०/– |

**✻ कविता/काव्यपंक्ती संग्रह**

| | |
|---|---|
| अक्षरबोली | ३०/– |
| कवितेच्या गावा | ३०/– |
| शब्दांची रत्ने | ६०/– |

**✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| स्वीकारशील स्वदेशी | ५०/– |
| हट्टी व्हा, हट्टी ! | ५०/– |
| हरित संदेश | १५/– |

**✻ भावभावनांशी निगडित लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| तरंग मनाचे | ५०/– |
| जिद्दीची लोभस रूपं | ६०/– |

**✻ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**

| | |
|---|---|
| प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास | ५०/– |
| व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत | ७०/– |
| कल्पक बनू या | ८०/– |
| गीता–गीताई | १०/– |

**✻ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके**

| | |
|---|---|
| आयुष्यातील वादळलाटा | ७०/– |
| कथा इस्रोची | ६०/– |
| आम्ही असे घडलो | ८०/– |

**✻ कृतिपर/अभ्यासपर पुस्तके**

| | |
|---|---|
| त्रिमितीची किमया | ५०/– |
| असे घटते सुंदर अक्षर | १५/– |
| प्रज्ञाबोध भाग ४ (NTS साठी उपयुक्त) | ६०/– |
| प्रज्ञाबोध भाग ५ (NTS साठी उपयुक्त) | ७०/– |

**✻ माहितीपर पुस्तके**

| | |
|---|---|
| छंद आकाशदर्शनाचा | ८०/– |
| आपला पाऊस | ३०/– |

**✻ OUR ENGLISH EDITIONS**

- Enhancement of Intelligence through play-1 — Rs. 150/-
- Enhancement of Intelligence through play-2 — Rs. 150/-
- Glory of Intelligence — Rs. 30/-
- Be Creative — Rs. 150/-
- Green Messages — Rs. 20/-

**पालक-शिक्षकांसाठी उपयुक्त पुस्तके**

- आश्वासक पालकत्व — ८०/–
- सामाजिक जाणीव संवर्धन — ८०/–
- रूप पालटू शिक्षणाचे — ३०/–
- बुद्धिवैभव — २५/–
- प्रबोधन गीते – पुस्तक — २०/–
  - MP3 Audio CD — ५०/–
- गंमत मोठ्ठ होण्यातली — १५०/–
- हसत खेळत बुद्धिविकास–१ — १५०/–
- हसत खेळत बुद्धिविकास–२ — १५०/–

**छात्र प्रबोधन संदर्भ DVD**

१४४ अंक/७५०० पाने फक्त १२५ रुपयांत

**ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक व वैचारिक पुस्तके**


- राष्ट्रद्रष्टे विवेकानंद — १२०/–
- विवेकानंद–कन्या भगिनी निवेदिता — ८०/–
- हरिसिंह नलुआ — ६०/–
- ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि.पेंडसे — १००/–
- विवेकानंदांचा राष्ट्रधर्म — ६०/–
- राष्ट्रदेवो भव — ५०/–
- समर्थ रामदास काय म्हणाले? — ६०/–
- स्मृतीतुनि स्फुरो कृती — १५/–
- महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म — ३०/–

**✻ ज्ञान प्रबोधिनी खंड – ४**


- भाग १–शिक्षण प्रभाग — १००/–
- भाग २–संशोधन प्रभाग — १००/–
- भाग ३–ग्रामविकसन प्रभाग — १००/–


सौर भाद्रपद, शके १९३५/सप्टेंबर२०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

**छात्र प्रबोधन वर्ष १३ इंद्रधनुषी मुखपृष्ठे**



वर्ष १३ अक १, सौर आश्विन



वर्ष १३ अक २, सौर कार्तिक


वर्ष १३ अक ३, सौर अग्रहायण



वर्ष १३ अक ४, सौर पौष



वर्ष १३ अक ५, सौर माघ


वर्ष १३ अक ६, सौर फाल्गुन


वर्ष १३ अक ७, सौर चैत्र


वर्ष १३ अक ८, सौर वैशाख


वर्ष १३ अक ९, सौर ज्येष्ठ


वर्ष १३ अक १०, सौर आषाढ


वर्ष १३ अक ११, सौर श्रावण


वर्ष १३ अक १२, सौर भाद्रपद

**सौर दिनदर्शिका**
**शके १९३५**

| | सप्टेंबर २०१३ | भाद्रपद आश्विन |
|---|---|---|
| र. | 1 | १० |
| सो. | 2 | ११ |
| मं. | 3 | १२ |
| बु. | 4 | १३ |
| गु. | 5 | १४ |
| शु. | 6 | १५ |
| श. | 7 | १६ |
| र. | 8 | १७ |
| सो. | 9 | १८ |
| मं. | 10 | १९ |
| बु. | 11 | २० |
| गु. | 12 | २१ |
| शु. | 13 | २२ |
| श. | 14 | २३ |
| र. | 15 | २४ |
| सो. | 16 | २५ |
| मं. | 17 | २६ |
| बु. | 18 | २७ |
| गु. | 19 | २८ |
| शु. | 20 | २९ |
| श. | 21 | ३० |
| र. | 22 | ३१ |
| सो. | 23 | आ.१ |
| मं. | 24 | २ |
| बु. | 25 | ३ |
| गु. | 26 | ४ |
| शु. | 27 | ५ |
| श. | 28 | ६ |
| र. | 29 | ७ |
| सो. | 30 | ८ |

**या वर्षाच्या १२ अंकातील लक्षवेधी साहित्याचा आढावा या अंकात पान क्र. २७ वर पाहा.**

**पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास तातडीने कळवा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० भाद्रपद, शके १९३५
१ सप्टेंबर २०१३
**www.chhatraprabodhan.org**
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

**प्रति -**